# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**रविवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२५ / अग्रहायण २३, १९४७ ( शके )**

**(१) मुख्यमंत्री**
**(२) पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री**
**(३) इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री**
**(४) पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री**
**(५) माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री**
**(६) परिवहन मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३३**

---

### महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) यांच्याकडून देण्यात येणारे विद्यावेतन व थेट प्रशिक्षण पुन्हा सुरु करण्याबाबत

**(१) * १५९६१ श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) यांच्याकडून राबविण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण योजनेत मासिक विद्यावेतन बंद करून केवळ ऑनलाइन प्रशिक्षण देण्यात येणार असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयामुळे ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गातील विद्यार्थ्यांना मासिक विद्यावेतन न मिळाल्याने त्यांच्यात नाराजी निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाज्योती संस्थेला शासनाकडून रुपये १५०० कोटी इतका निधी माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये मंजूर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, इतर मागासवर्ग प्रवर्गासाठी प्राप्त निधीतून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती आणि इतर सर्व योजना राबविण्यात येणार असून विद्यावेतन व थेट प्रशिक्षण बंद असलेल्या ग्रामीण भागातील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील विद्यार्थ्यांना थेट मार्गदर्शन तसेच आवश्यक भौतिक संसाधने उपलब्ध न झाल्याने गरीब विद्यार्थ्यांना प्रशिक्षणात नुकसान होणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार विद्यार्थ्यांचे विद्यावेतन व थेट प्रशिक्षण पुन्हा सुरू करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) व (२) महाज्योती संस्थेमार्फत संघ लोकसेवा आयोग (UPSC), महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) राज्यसेवा, संयुक्त गट ब व क तसेच मिलीटरी भरती प्रशिक्षण या स्पर्धा परीक्षांचे प्रशिक्षण ऑफलाईन स्वरूपात देण्यात येते. त्याकरिता विद्यार्थ्यांना विद्यावेतन व आकस्मिक निधी देखील देण्याची योजना नियमित सुरू आहे.

तथापि, IBPS-PO/Banking/Railway (IBPS), कर्मचारी निवड आयोग (SSC), रेल्वे भरती (RRB) तसेच महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा (MES) या परीक्षांचे स्वरूपच ऑनलाईन परिक्षा पध्दती असल्याने विद्यार्थ्यांनी अनेकवेळा ऑनलाईन प्रशिक्षणाची मागणी महाज्योती कार्यालयास केली होती. त्यानुसार सदर प्रशिक्षण ऑनलाईन पद्धतीने राबविण्याचे प्रस्तावित असून त्याकरिता विद्यार्थ्यांना प्रशिक्षण संस्थेमार्फत टॅबलेट व डेटा देण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नाराजी तसेच संतापाची भावना निर्माण होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

(३) महाज्योती संस्थेला सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात विद्यावेतन व प्रशिक्षण या खर्चाकरिता रु.२९९.०० कोटी इतका निधी मंजुर करण्यात आला असून रु. २९९.०० कोटीच्या मर्यादेत महाज्योतीमार्फत विविध योजना राबविण्यात येत आहे. त्यापैकी रु.१७९.४० कोटी इतका निधी महाज्योती कार्यालयास वितरीत करण्यात आलेला आहे.

(४) प्रशिक्षणासाठी डेटा सिम निवडण्याचे स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना देण्यात आल्याने त्यांच्या क्षेत्रात ज्या स्थिर इंटरनेट सेवा उपलब्ध आहेत त्या विद्यार्थ्यांना घेता येणार असून त्याकरीता लागणारी रक्कम विद्यार्थ्यांना आधार सिडींगद्वारे थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील भाकड/अनुत्पादक जनावरांच्या संख्येत वाढ होत असल्याबाबत

**(२) * २०८७७ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गोवंश हत्या बंदी कायद्यामुळे शेतकऱ्यांकडील भाकड जनावरांची संख्या वाढत असून शेतकरी संघटनांनी संगमनेर (जि.अहमदनगर) येथील प्रांत कार्यालयासमोर भाकड जनावरे घेऊन दिनांक १० सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्या दरम्यान आंदोलन केले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात गोवंश हत्या बंदी कायद्याचा आधार घेत कायदेशीर मार्गाने पशुधनाची ने-आण करणाऱ्या शेतकऱ्यांना देखील काही संघटनांकडून त्रास देण्यात येत असून माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये एका प्रकरणात सदर संघटनांनी जप्त केलेले पशुधन परत आणण्यास गेलेल्या एका लोकप्रतिनिधींवर हल्ला केल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संघटनांच्या मनमानीवर चाप लावण्याबाबत तसेच शेतकऱ्यांकडील भाकड जनावरांची संख्या वाढत असून सदर शेतकऱ्यांना तात्काळ दिलासा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) पशुधनाची ने-आण करणारी वाहने अडवल्याबाबत प्राप्त तक्रारीनुसार अहिल्यानगर जिल्हयात बोगस गोरक्षक बनवून लुटमार करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध पोलीस ठाणे, श्रीगोंदा व पोलीस ठाणे, शेवगाव येथे प्रत्येकी एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त केलेले पशुधन परत आणण्यास गेलेल्या एका लोकप्रतिनिधीवर हल्ला करण्यात आल्याचे निदर्शनास आलेले नाही.

शेतकऱ्यांकडील भाकड/अनुत्पादक गायी संगोपनाकरिता गोशाळेत ठेवण्यात येतात. या भाकड/अनुत्पादक गायींच्या संगोपनाकरिता गोशाळांना आर्थिक दृष्टया सक्षम करण्यासाठी शासन निर्णय दिनांक ०८ ऑक्टोबर, २०२४ नुसार सन २०२४-२५ पासून गोशाळेत ठेवण्यात येणा-या देशी गायींना रु.५०/- प्रति दिन प्रति पशु अनुदान देण्यात येते.

याशिवाय गोशाळांमधील गायींना शासकीय पशुवैद्यकीय संस्थांकडून पशुवैद्यकीय आरोग्यसेवा पुरविण्यात येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे गळनिंब (ता.श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर) येथील तरुणाने आत्महत्या केल्याबाबत**

**(३) * २२०५३ श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गळनिंब (ता.श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर) येथील कु.अनिकेत सोमनाथ वडितके हा १७ वर्षीय अल्पवयीन मुलगा स्वतःच्या वाहनातून गाई घेऊन कोल्हार ते राजुरी या मार्गावरून जात असताना कथित गोरक्षक व्यक्तींनी वाहन अडवून त्याला दिनांक २७ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान मारहाण करुन व त्यांचे छायाचित्र काढून समाजमाध्यमांवर पसरविले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी लोणी (ता.राहाता, जि.अहिल्यानगर) येथील पोलीसांनी गोवंश तस्करीच्या आरोपाची खात्री न करता कु.अनिकेत सोमनाथ वडितके याच्यावर गुन्हा दाखल केल्याने व बदनामी सहन न झाल्याने त्याने राहत्या घरी दिनांक २८ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान गळफास घेऊन आत्महत्या केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) लोणी पोलीस स्टेशन येथे प्राप्त फिर्यादीवरून गु. र. नं. ५८२/२०२५, भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०७, ३५१(२) सह ज्युवेनाईल जस्टीस ॲक्ट कलम ७४ प्रमाणे दिनांक २९ ऑक्टोबर, २०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

-----------------

## कल्याण ग्रामीण (जि.ठाणे) येथील परिसरात टोरेंट पॉवर लिमिटेड कंपनीकडून वीज देयकांची अतिरिक्त वसुली केली जात असल्याबाबत

**(४) * १७९०१ श्री.राजेश मोरे (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण ग्रामीण (जि.ठाणे) येथील १४ गावे तसेच शिळ-देसाई व मुंब्रा-कळवा परिसरात टोरेंट पॉवर लिमिटेड कंपनीकडून सरासरी १०० युनिट वापर करणाऱ्या शेतकरी व नागरिकांनी योग्य व्होल्टेज न मिळाल्याच्या तक्रारी केल्यानंतर कंपनीकडून १००० युनिटपर्यंत वीज देयक आकारीत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शेतकऱ्यांच्या परवानगीशिवाय त्यांच्या शेतात अनधिकृत विद्युत खांब व ट्रान्सफार्मर उभारणे, कोणतीही पूर्वसूचना न देता जबरदस्तीने काम करणे, गुंडप्रवृत्तीच्या लोकांकडून दमदाटी, दादागिरी व नागरिकांच्या घरात घुसून देयक भरण्याबाबत धमकावणे अशा प्रकारच्या घटना घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे येथील शेतकरी उपरोक्त त्रासाला कंटाळून आत्महत्येस प्रवृत्त झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर देखील कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह शेतकऱ्यांकडून अतिरिक्त आकारण्यात आलेल्या देयकाची रक्कम परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

मा. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाच्या बहुवार्षिक वीजदर आदेशानुसार वीज दर निश्चित केले जातात. संबंधित वीजदर हे महाराष्ट्रातील सर्व वीज ग्राहकांसाठी सारखेच असून, वीजग्राहकांच्या वर्गवारीनुसार आकारले जातात. महावितरणच्या ग्राहकास लागू असलेल्या दराप्रमाणेच आणि प्रत्यक्ष वीज वापर व मीटर वाचनाप्रमाणेच, मे. टोरंट पॉवर लिमीटेड मार्फत शिळ, मुंब्रा, कळवा वितरण फ्रॅन्चाइझी विभागातील सर्व ग्राहकांना वीज देयके दिली जातात.

(२) व (३) हे खरे नाही.

सर्वसाधारणपणे मे. टोरंट पॉवर कं.लि. तर्फे शिळ, मुंब्रा, कळवा वितरण फ्रॅन्चाइझी विभागातील वीजग्राहकांच्या जागेमध्ये विद्युत खांब अथवा ट्रान्सफॉर्मर उभारताना शेतकऱ्यांची, वीजग्राहकांची परवानगी घेवून कामे केली जातात.

मे. टोरंट पॉवर लि. मार्फत ग्राहकांना योग्य, दर्जेदार व विनाविलंब सेवा देण्याकरीता शिळ, मुंब्रा, कळवा वितरण फ्रॅन्चाइझी विभागात ५ अत्याधुनिक ग्राहकसेवा केंद्रे उभारली आहेत. याव्यतिरीक्त, मे. टोरंट पॉवर लि. मार्फत २४ x ७ टोल फ्री क्रमांक, ग्राहक पोर्टल (connect.torrentpower.com) आणि मोबाईल ॲप्लीकेशन (Torrent Connect) अशा यंत्रणेमार्फत तक्रार नोंदणीचे पर्याय ग्राहकांना उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. मे. टोरंट पॉवर लि. यांचे मार्फत ग्राहक तक्रार निवारण विहीत वेळेत केले जाते याची नियमितपणे तपासणी महावितरणचे नोडल अधिकारी करतात. याव्यतिरिक्त ही ग्राहकांचे समाधान न झाल्यास ग्राहक तक्रार निवारणासाठी अधिक्षक अभियंता ठाणे शहर मंडळ यांचेकडे दाद मागू शकतात. तसेच मे. टोरंट पॉवर लि. मार्फत वीज ग्राहकांच्या तक्रार निवारणासाठी दिनांक २५ नोव्हेंबर, २०२५ रोजी शिळ, मुंब्रा, कळवा वितरण फ्रॅन्चाइझी विभागात विशेष ग्राहक सेवा शिबिर आयोजीत करण्यात आले होते. यामध्ये ९७ वीज ग्राहकांनी सहभाग नोंदविला होता व त्यांच्या विविध तक्रारींचे निरसन करण्यात आले.

(४) शिळ, मुंब्रा, कळवा वितरण फ्रॅन्चाइझी विभागातील ग्राहकांच्या वीज देयकातील अनियमितता तपासण्याकरीता त्रिसदस्यीय उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या निष्कर्षानुसार शिळ, मुंब्रा, कळवा वितरण फ्रॅन्चाइझी विभागातील सर्व वर्गवारीच्या वीज ग्राहकांची वीज बिले मा. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने ठरविलेल्या दरानुसार आकारण्यात येत असल्याचे दिसून आले व त्यात कोणत्याही प्रकारची अनियमितता आढळून आली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चेंबूर (मुंबई) येथील आरसीएफ पोलीस ठाण्याच्या हद्दीत अंमली पदार्थांची विक्री होत असल्याबाबत

**(५) * २०९१२ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंबूर (मुंबई) येथील आरसीएफ पोलीस ठाण्याच्या हद्दीत साई निकेतन सोसायटीमध्ये राहणाऱ्या व मा.उच्च न्यायालयात प्रॅक्टीस करणाऱ्या महिला वकिल यांनी एमएमआरडीए वसाहतीतील विनय हायस्कुल, नागबाबा रोड, वाशीनाका, चेंबूर आदी परिसरात घरोघरी व रस्त्यावर ड्रग्ज पेडलरकडून चरस, गांजा, एमडी ड्रग्सची सर्रास तस्करी व विक्री करण्यात येत असल्याची लेखी तक्रार पोलीस ठाण्यात व पोलीस उप आयुक्त यांचेकडे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी पोलीसांनी ड्रग्स विक्रेत्यांवर कारवाई करण्याऐवजी त्यांचेबरोबर अर्थिक संगनमत करून उलट तक्रारदार महिला वकिलावर खोटे गुन्हे दाखल केले असल्याचे व जमावाद्वारे हल्ला केला गेला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे सदर महिला वकिलाने न्याय मिळण्याकरिता मा.मुख्यमंत्री व मा.उपमुख्यमंत्री महोदयांना दिनांक २८ जुलै, २०२५ रोजी वा त्यादरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अहवालात काय आढळून आले व त्यानुषंगाने सर्व संबंधितांविरुद्ध सत्वर कारवाई करुन महिला वकिलाला संरक्षण देण्याबाबत तसेच दोषी पोलिसांवर कारवाई करण्यासह ड्रग्सचे रॅकेट समूळ नष्ट करुन युवा पिढीला व्यसनापासून वाचविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) नाही.

दिनांक ०१ ऑगस्ट, २०२५ रोजी वकील महिला यांनी दिलेल्या फिर्यादीवरून एका महिला व अन्य व्यक्तीविरूध्द आर.सी. एफ पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ४२९/२५ भारतीय न्याय संहिता कलम ३१०(२), ७४, १२६(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच सदर गुन्ह्यातील आरोपींपैकी एका महिलेच्या फिर्यादीवरून गु.र.क्र. ४२९/२५ गुन्ह्यातील तक्रारदार वकील महिला व तिची बहीण यांच्याविरूध्द गु.र.क्र. ४३०/२५ कलम ३०९ (६), ३०८ (३), ११५ (२), ३५२,३(५) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल केलेला आहे. वरील नमूद दोन्ही गुन्हे तपासाअंती अदखलपात्र असल्याचे निष्पन्न झाल्याने, सदर दोन्ही गुन्हयांची "अदखलपात्र गुन्हा समरी" (एनसी फायनल) अहवाल मंजुरीकरीता मा. ५२ वे न्यायालय, कुर्ला, मुंबई यांना सादर करण्यात आलेला आहे.

(३) होय.

(४) सदर प्रकरणी महिला वकील यांनी केलेल्या तक्रारीवरुन बिल्डींग नं १६, रूम नं २१२, २१३, २१४, २१५ साई निकेतन सोसायटी, म्हाडा वसाहत, वाशीनाका, चेंबूर, मुंबई या ठिकाणी आर. सी. एफ पो. ठाणे अन्वये दिनांक ३० सप्टेंबर, २०२५ रोजी पोलीस पथकाने सदर घराची झडती घेतली असता, सदर ठिकाणी काहीही संशयित आढळून आले नाही.

एमएमआरडीए वसाहतीतील विनय हायस्कुल, नागाबाबा रोड, वाशीनाका, चेंबूर आदी परिसरात आर.सी.एफ. पोलीस ठाणे येथे एनडीपीएस ॲक्ट १९८५ अंतर्गत सन २०२५ मध्ये अद्यापपर्यंत अंमली पदार्थ विक्रीकरीता जवळ बाळगल्या प्रकरणी एकूण ११ गुन्हे दाखल आहेत. सदर गुन्हयांत एकूण २४ आरोपींना अटक करण्यात आलेली असून, सुमारे १७ कि.ग्रॅ. वजनाचे व अंदाजे रू. २५ कोटी रकमेचे अंमली पदार्थ कारवाई दरम्यान जप्त करण्यात आले आहेत. तसेच सन २०२५ मध्ये अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्यांविरोधात ६१ गुन्हे दाखल केलेले आहेत. तसेच पोलीस ठाणे हद्दीत कोठेही ड्रग्स खरेदी, विक्री करणारे तसेच पेडलर व ड्रग्स सेवन करणारे कोण आढळल्यास त्यांच्यावर त्वरित एनडीपीएस ॲक्ट १९८५ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येते.

तसेच अंमली पदार्थ संदर्भात घडणाऱ्या घटनांप्रकरणी कोणतेही पोलीस अधिकारी व अंमलदार दोषी आढळून आलेले नाहीत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हयात फॉरेक्स ट्रेडिंगमध्ये गुंतवणुकीचे आमिष दाखवून गुंतवणूकदारांची केलेली फसवणूक

**(६) * २०३८३ श्री.अमोल खताळ (संगमनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात फॉरेक्स ट्रेडिंगमध्ये गुंतवणूक केल्यास दीड महिन्यात रक्कम दुप्पट देण्याचे आमिष दाखवून श्री.राजेंद्र भीमराव नेर्लीकर (रा.शिवाजीनगर, हुपरी) या व्यक्तीने शेकडो गुंतवणूकदारांची तब्बल १२.३५ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी त्याने उत्तर कोल्हापूर येथील एका मुनी महाराजांचा विश्वास संपादन करुन त्यांच्या भक्त संप्रदायिकांस गुंतवणूक करण्याचे आवाहन केले असता त्यांनी देखील पैसे गुंतविले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधितांविरुद्ध कारवाई करण्यासह गुंतवणूकदारांचे पैसे परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी मुनी महाराज अथवा त्यांच्या मार्फतीने कोणी भक्त संप्रदायीक यांनी अश्या प्रकारची गुंतवणूक केली असल्याची तक्रार दिलेली नाही.

(३) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असुन दिनांक २२ ऑक्टोबर, २०२४ रोजी कोल्हापूर जिल्ह्यामध्ये हुपरी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ३०३/२०२४ भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, ४०९, ४१७, ५०६, २१२ सह एम.पी.आय.डी. कलम ३, ४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखा कोल्हापूर यांच्या मार्फत चालू असून सदरच्या गुन्ह्यात एकूण ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत तीनही आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत.

तसेच सदरच्या गुन्ह्यातील फसवणूक केलेली रक्कम हस्तगत करणेकामी आरोपींनी अथवा त्यांच्या संबंधितांनी फसवणुकीच्या रक्कमेतून ज्या स्थावर व जंगम मालमत्ता घेतल्या आहेत त्या मालमत्तांचा तपास सुरु आहे. याबाबत निबंधक हातकणगंले, राधानगरी, कोल्हापूर करवीर- १,२,३,४ तसेच तलाठी हुपरी, कोते. नगरपरिषद हुपरी, जि. कोल्हापूर यांना मालमत्तेची माहिती देण्याबाबत पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

उपरोक्त प्रमाणे संकलित माहितीची पडताळणी करुन तपासा अंती निष्पन्न होणाऱ्या स्थावर, जंगम मालमत्ता आणि बँक खात्यातील फ्रिज करण्यात आलेल्या रक्कमांबाबत एमपीआयडी प्रस्ताव कायदेशीर कार्यवाहीकरीता शासनाकडे पाठविण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील वीज दरवाढीमुळे उद्योग राज्याबाहेर स्थलांतरीत होत असल्याबाबत**

**(७) * १५६६२ श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वीज महावितरणकडून उद्योगांच्या वीज देयकात माहे सप्टेंबर, २०२५ पासून इंधन समायोजन आकार (FAC) व वीज विक्री कराचा अतिरिक्त भार टाकण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वीज दरवाढीमुळे राज्यातील प्रति युनिट दर ११.७५ रुपये झाल्यामुळे उद्योगांना आर्थिक फटका बसत असून उत्पादन खर्च वाढल्याने अनेक उद्योग तोट्यात जाऊन बंद पडणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील विशेषत: बुलढाणा व जालना जिल्ह्यातील स्टील उद्योग आधीच संकटात असताना व वीज दरात पुन्हा वाढ केल्याने सदर उद्योग आर्थिक अडचणीत सापडले असून उक्त उद्योग राज्याबाहेर स्थलांतरीत होत असल्याचे दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने वीज दरवाढीच्या निर्णयाचा फेरविचार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

माहे जुलै व ऑगस्ट, २०२५ मध्ये मा.आयोगाने मंजूर केलेल्या प्रति युनिट वीज खरेदी खर्चापेक्षा प्रत्यक्ष प्रती युनिट खर्चामध्ये वाढ झाल्यामुळे माहे सप्टेंबर व ऑक्टोबर, २०२५ मध्ये ग्राहकांच्या वीज देयकांमध्ये इंधन समायोजन शुल्क आकारण्यात आलेले आहे. परंतु, माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये ग्राहकांच्या वीज देयकांमध्ये कोणत्याही प्रकारचे इंधन समायोजन शुल्क आकारण्यात आलेले नाही. तसेच महावितरणकडून माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये वाढीव अतिरिक्त वीज विक्रीकर आकारण्यात आला नाही.

(२) हे खरे नाही.

मागील वर्षातील औद्योगिक वीज दरवाढीचा ऐतिहासिक कल लक्षात घेता, जर महावितरणने “प्रचलित पध्दतीने व्यवसाय (Business as usual)” पध्दती अवलंबली असती, तर सध्याचा औद्योगिक वीज दर रू. १०.८८ प्रति युनिट (आर्थिक वर्ष २०२४-२५) मध्ये आर्थिक वर्ष २०२९-३० मध्ये रू.१५.७७ प्रति युनिटपर्यंत वाढ झाली असती, परंतु महावितरणने केलेल्या प्रयत्नांमुळे तसेच मा.आयोगाच्या दिनांक १५ जून, २०२५ रोजीच्या वीजदर आदेशानुसार औद्योगिक ग्राहकांसाठी सरासरी विजेच्या दरात आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या तुलनेत आर्थिक वर्ष २०२५-२६ करिता ०.९२% व त्यानंतर ५ व्या नियंत्रण कालावधीच्या अखेरपर्यंत ८.३६% पर्यंत कपात मंजूर केली आहे. या मध्ये बदल करण्याचा अधिकार मा.आयोगास आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या अनुदानात कपात केल्याबाबत**

**(८) * १९०७८ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या सन २०२४-२०२५ या अर्थसंकल्पात महाज्योतीसाठी रुपये २९७ कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली असताना प्रत्यक्षात फक्त रुपये २०७ कोटी इतकी रक्कम वितरीत करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाज्योतीसाठी निश्चित केलेल्या अनुदानात तब्बल रुपये ९० कोटी इतक्या मोठ्या रकमेची कपात करण्यामागील कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर कपातीमुळे महाज्योतीच्या विविध शैक्षणिक, विद्यार्थीवर्गीय व कौशल्यविकास योजनांवर परिणाम झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) होय.
(२), (३) व (४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय, दिनांक २५ जुलै, २०२४ अन्वये महाज्योती, नागपूर या संस्थेकरिता रु.४५३.६६ कोटी वार्षिक कृती आराखड्यास अर्थसंकल्पिय तरतूदीच्या रु. ३०० कोटीच्या मर्यादेत चालू आर्थिक वर्षी (सन २०२४-२०२५) मान्य करून उर्वरित रु. १५३.६६ कोटी इतक्या रकमेस पुढील वर्षाच्या (सन २०२५-२०२६) अर्थसंकल्पिय तरतुदीच्या अधीन राहून मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षामध्ये विद्यावेतन व प्रशिक्षण योजनेकरिता रु. २९७ कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला होता. त्यापैकी सुधारित अंदाज रु. २०७.९० कोटी इतका होता.

माहे डिसेंबर-२०२५ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनामध्ये विद्यावेतन व प्रशिक्षण योजनेकरिता सन २०२४-२०२५ मधील उर्वरित प्रलंबित दायित्वासह निधी उपलब्ध करून देण्यासाठी रु.५२६.५५ कोटी इतक्या रकमेचा पुरवणी मागणी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## राज्यातील आंतरराष्ट्रीय कॉल सेंटरच्या माध्यमातून नागरिकांची होत असलेली फसवणूक

**(९) * १७८७६ श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला), श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिकलठाणा (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ परिसरातील कनेक्ट एंटरप्रायजेस टी-७ एसटीपी-१ या चार मजली इमारतीमध्ये आंतरराष्ट्रीय कॉल सेंटरमधील गैरकारभार दिनांक २७ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान छापा मारून निदर्शनास आणला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच इगतपुरी (जि.नाशिक) येथे परदेशी नागरिकांनी आरोग्य विम्याच्या नावाखाली फसवणूक करत एक बनावट कॉल सेंटर सुरू केल्याप्रकरणी चौकशी करून कारवाई करण्याची मागणी माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये विविध संघटनांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली असून रायगड, पालघर, पुणे शहर व जिल्ह्यातील बनावट कॉल सेंटरच्या माध्यमातून परदेशी नागरिक फसवणूक करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, जळगाव शहराजवळील फार्म हाऊसवर पोलिसांनी घातलेल्या छाप्यामध्ये ३२ लॅपटॉप व ७ मोबाईल सापडले असून त्या ठिकाणी बनावट कॉल सेंटर सुरु असल्याचे दिनांक २८ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून, राज्यात काही ठिकाणी बनावट कॉल सेंटर चालविण्यामागे अनेक वरिष्ठ स्तरावरील अधिकारी देखील सहभागी असल्याचे सीबीआयच्या तपासात उघड झाल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह केंद्र शासन, केंद्रीय अन्वेषण ब्युरो (CBI),परराष्ट्र मंत्रालय व आंतरराष्ट्रीय सायबर कायदा संस्था यांच्याशी समन्वय साधून अशा बनावट कॉल सेंटरमधून सायबर फसवणूक, क्रिप्टोकरन्सीच्या माध्यमातून आर्थिक व्यवहार व डिजिटल रॅकेटचा साखळी स्वरूपाचा विस्तार रोखण्यासाठी राज्य पोलिस दल, सायबर क्राइम सेल व आर्थिक गुन्हे शाखेद्वारे कोणती प्रतिबंधात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) इगतपुरी (जि. नाशिक) येथे परदेशी नागरिकांनी आरोग्य विम्याच्या नावाखाली फसवणूक करत एक बनावट कॉल सेंटर सुरू केल्याप्रकरणी सीबीआय मार्फत कारवाई करण्यात आली आहे.

रायगड पोलीस घटकातील अलिबाग पोलीस ठाणे येथे अवैध कॉल सेंटर चालविले जात असल्याबाबत गु.र.नं १७६/२०२४ भारतीय न्याय संहिताचे ३१९(२), ३१८(४), ३३८, ३३९, ६१(२) माहिती तंत्रज्ञान कायदा २००० चे कलम ६६(क), ६६(ड) सह इंडीयन टेलीग्राम ॲक्टचे कलम २०, २१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील एकूण ४० आरोपींविरूद्ध मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

पुणे शहरात बनावट कॉल सेंटरच्या माध्यमातून परदेशी नागरीकांची फसवणूक केल्याप्रकरणी सायबर पोलीस ठाणे, पुणे शहर येथे गु.र.नं. ५७/२०२५ भारतीय न्याय संहिताचे कलम ३१६(२), ३१८(४), ६१(१), ६१(२), ३(५) व माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ (सी), ६६ (डी) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

दिनांक २२ जुलै, २०२५ रोजी सदर गुन्ह्यातील १२३ आरोपींविरुद्ध मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

तसेच हडपसर पोलीस ठाणे, पुणे शहर येथे गु.र.नं. ८४४/२०२५ भारतीय न्याय संहिताचे कलम ३१६ (२), ३१८(४), ६१(१), ३(५) माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ (सी), ६६ (डी), ६६ (इ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आहे. सदर गुन्ह्यात ३ आरोपींना अटक करण्यात आले असून सद्य:स्थितीत आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. तसेच दिनांक २८ नोव्हेंबर, २०२५ रोजी सदर गुन्ह्यातील अटक आरोपींविरुद्ध मा. न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

बनावट कॉल सेंटरच्या माध्यमातून परदेशी नागरीकांची फसवणूक केल्याप्रकरणी वाडा पोलीस ठाणे, पालघर येथे गु.र.नं. २७५/२०२३ भारतीय दंड विधान संहिताचे कलम ४२०, ४१९, १२०(ब), १८८, २०१, ३४ सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ४३, ६६(डी), ६६, ७५ सह भारतीय बिनतारी तारयंत्र अधिनियम १९३३ चे कलम ५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात एकूण २७ आरोपींविरूद्ध मा. प्रथम वर्ग न्यायालय, वाडा येथे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(३) जळगाव जिल्हा घटकात जळगाव तालुका पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रातील ममुराबाद शिवारात एल. के. फॉर्म येथे संगनमत करुन स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी संघटीतरित्या एकत्रित येवून बनावट ॲमेझॉनचे कस्टमर कॉल सेंटर चालवून संगणक इंटरनेटच्या माध्यमातून स्वतःला ॲमेझॉनचे व इतर कंपन्यांचे तसेच बँकांचे प्रतिनिधी असल्याचे ग्राहकांना खोटे सांगून X-Lite या कॉलींग ॲप्लीकेशनच्या माध्यमातून इंटरनेट कॉलींग व्दारे अमेरिका, कॅनडा, यु.के. येथील लोकांना कॉल करुन त्यांचा विश्वास संपादन करुन परकिय नागरिकांची फसवणूक केल्यासंदर्भात जळगाव तालुका पो.स्टे. येथे दिनांक २९ सप्टेंबर, २०२५ रोजी CCTNS नं. ३१४/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ६१(२), ३१८(४), ३१९(२), ३३६(३), ३३८, ३४०(२), ३५१, १११, ३(५) सह माहिती तंत्रज्ञान कायदा सन २००० चे कलम ६६ (क) (ड), दूरसंचार अधिनियम २०२३ चे कलम ३(१), ४२(१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात सहभागी व निष्पन्न अशा एकूण १० आरोपींना अटक करण्यात आली असून सद्य:स्थितीत सर्व आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. तसेच गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

(४) राज्य शासनाने सायबर फसवणुकीला बळी पडणाऱ्या नागरिकांना विशेषत: महिला, बालके व ज्येष्ठ नागरिकांना केंद्र स्थानी ठेवून अत्याधुनिक तंत्रज्ञान, कुशल मनुष्यबळ आणि संसाधनांनी युक्त अशा उपाय योजनांचा समावेश असलेल्या महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प कार्यान्वित केला आहे.

राज्यभरातील सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी महापे, नवी मुंबई येथे नोडल सायबर पोलीस स्टेशन कार्यरत असून त्याद्वारे राज्यातील ५० जिल्हा सायबर लॅब्सच्या कार्यक्षमतेसाठी आणि तांत्रिकदृष्ट्या गुंतागंतीच्या सायबर गुन्ह्यांच्या तपासासाठी हे केंद्र कार्यरत आहे.

सर्व प्रकारचे सायबर गुन्हे रोखण्याकरीता www.cybercrime.gov.in ही वेबसाईट व सायबर हेल्पलाईन नंबर १९३० बाबत सर्व सामान्य जनतेत महाराष्ट्र सायबरच्या सोशल मिडीया Twitter, Instagram, Facebook, YouTube अकांउटद्वारे जनजागृती करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी पदाचा दुरुपयोग करून नागरिकांना त्रास दिल्याबाबत

**(१०) * २१३८९ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या श्री.महादेव घागरे, श्री.सुशांत पवार व श्री.जितेंद्र पेडणेकर यांनी चौके येथील एका राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याच्या घरात किमती ऐवज लुटण्याच्या उद्देशाने बळजबरीने अनधिकृतपणे प्रवेश करण्याचा प्रयत्न केला असल्याबाबतची तक्रार पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांच्याकडे दिनांक १५ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी संबंधित कर्मचारी पदाचा दुरुपयोग करून व धमकी देऊन नागरिकांकडून बळजबरीने पैसे वसूल करीत असल्याने तसेच दिवसेंदिवस उपद्रव वाढत असल्याने येथील त्रस्त झालेल्या नागरिकांनी संबंधित कर्मचाऱ्यांविरुद्ध पोलीस निरीक्षक, मालवण यांच्याकडे तक्रार केल्यानंतर देखील कोणती कारवाई करण्यात आली नसल्याचे त्याच दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने पदाचा दुरुपयोग करून नागरिकांना त्रास देणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

मालवण पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या (१) सुशांत शांताराम पवार, पोलीस हेड कॉन्स्टेबल (२) जितेंद्र रमेश पेडणेकर, पोलीस हेड कॉन्स्टेबल (३) महादेव अभिनाथ घागरे, पोलीस कॉन्स्टेबल यांनी बंद घरा (फार्महाऊस) मध्ये अनाधिकारपणे प्रवेश केल्याबाबत माजी सरपंच, शिवसेना मालवण तालुका प्रमुख श्री. राजन शशिकांत गावडे, चौके यांनी तसेच उपरोक्त नमूद पोलीस कर्मचारी यांच्या बद्दल नागरिकांच्या अनेक तक्रारी असल्याने त्यांच्यावर उचित कारवाई करावी याबाबत श्री. देवदत्त (दत्ता) सामंत, रा-मालवण, शिवसेना जिल्हाप्रमुख यांनी स्वतंत्रपणे दिनांक १५ ऑक्टोबर, २०२५ रोजी पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांना तक्रार अर्ज दिलेले आहेत.

(२) हे खरे नाही.

उपरोक्त नमूद दोन्ही तक्रारीच्या अनुषंगाने सखोल चौकशी करण्याबाबत दिनांक १८ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांच्या आदेशान्वये उपविभागीय पोलीस अधिकारी, कणकवली यांना आदेशीत करण्यात आले आहे.

(३) दोन्ही अर्जामध्ये असलेल्या आशयाच्या अनुषंगाने उपविभागीय पोलीस अधिकारी, कणकवली यांनी केलेल्या चौकशीमध्ये अर्जदार यांनी अनुक्रमे १) घराच्या (फार्महाऊस) कंम्पाऊंडमध्ये अनाधिकारे प्रवेश करणे, २) पोलीस कर्मचारी यांच्या बद्दल नागरीकांच्या असलेल्या अनेक तक्रारी, यासंदर्भात संबधीत अंमलदार यांनी बेकायदेशीर कृत्ये केले असल्याच्या बाबी निदर्शनास आलेल्या नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लोणार (जि.बुलढाणा) सरोवरातील पाण्याची पातळी वाढल्यामुळे जैवविविधतेस धोका निर्माण झाल्याबाबत

**(११) * २०१७२ श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील जागतिक भूवैज्ञानिक वारसा म्हणून युनेस्कोने मान्यता दिलेल्या लोणार सरोवरातील पाण्याची पातळी वाढल्यामुळे तसेच मानवी हस्तक्षेप व पर्यावरणातील असमतोल वाढल्याने जैवविविधतेला धोका निर्माण झाल्याची घटना माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोणार शहरातून मोठ्या प्रमाणावर सांडपाणी थेट सरोवरात वाहून जात असल्यामुळे पाण्याचा रासायनिक समतोल बिघडून सुक्ष्मजीव, दुर्मिळ प्रजाती व पक्षी संवर्धन यावर प्रतिकूल परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सरोवर परिसरातील पर्यटकांच्या वाढत्या संख्येमुळे तसेच अनियंत्रित मानवी व पर्यावरणीय हस्तक्षेप, झाडतोड, कचरा आणि प्लास्टिक प्रदुषणामुळे सरोवरातील गाळाची पातळी आणि 'पीएच' पातळी बदलल्याची नोंद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करून लोणार सरोवराचे संवर्धन करण्यासाठी सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प, पर्यावरणीय वहनक्षमता मर्यादा ठरवून नियमन, अतिक्रमण रोखण्यासाठी संरक्षणात्मक उपाय व जैवविविधता संरक्षण आराखडा तयार करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई :** (१) होय, अंशत: खरे आहे.

लोणार सरोवर परिसरात सन २०२५ मधील माहे मे ते ऑक्टोबर या कालावधीत झालेली अतिवृष्टी, परिसरातील झऱ्यांचा प्रवाह व सरोवरातील पाणी बाहेर पडण्यास नसलेली जागा यामुळे लोणार सरोवर पाण्याच्या पातळीमध्ये वाढ झाली आहे.

(२) हे, खरे नाही.

(३) लोणार सरोवरातील क्षारयुक्त पाण्याचा pH कमी झाल्याचे भू-जल सर्वेक्षण यंत्रणेच्या पाणी तपासणीत आढळून आले आहे. यासाठी लोणार सरोवर परिसरात सन २०२५ यावर्षी झालेली अतिवृष्टी आणि परिसरातील झऱ्यांचा सातत्यपूर्ण गोड पाण्याचा प्रवाह यामुळे pH कमी झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(४) अंशत: खरे आहे.

महसूल व वन विभागाच्या दिनांक २४ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये लोणार सरोवराचे जतन, संवर्धन आणि विकास आराखड्याबाबत लोणार सरोवर विकास समिती मा. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेली आहे.

लोणार सरोवराच्या विकासाकरिता नियोजन विभागामार्फत दिनांक ३० सप्टेंबर, २०२४ रोजी सुधारित आराखडा मंजूर करण्यात आला आहे. त्यातून लोणार नगरपरिषदेकरिता नवीन सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प व भुयारी गटार योजना मंजूर करुन कामे प्रगतीपथावर आहेत.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दिनांक ११ जानेवारी, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती यांच्या कुलगुरुंच्या अध्यक्षतेखाली वैज्ञानिक सल्लागार मंडळाची स्थापना करण्याबाबत आली आहे.

तसेच, लोणार सरोवराच्या विविध बाबींवर IIT मुंबई संस्थेकडून अध्ययन व संशोधनाचे काम सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील पोलीस उपनिरीक्षक पदे रिक्त असल्याबाबत

**(१२) * १७८३७ श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनामध्ये पोलीस उपनिरीक्षक यांची (पीएसआय) दोन हजाराहून अधिक पदे रिक्त असताना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) नुकत्याच जाहीर झालेल्या गट-ब संयुक्त पूर्व परीक्षेच्या जाहिरातीत पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) पदांचा उल्लेख नसल्याचे माहे ऑगस्ट,२०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमपीएससी मार्फत दरवर्षी पीएसआय राज्यकर निरक्षक (एसटीआय) आणि सहाय्यक कक्ष अधिकारी (एएसओ) यासाठी संयुक्त पूर्व परीक्षा घेतली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने तातडीने पीएसआयची पदे समाविष्ट करून नवीन जाहिरात काढण्याची मागणी विद्यार्थ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) पोलीस उपनिरीक्षक, राज्य कर निरीक्षक व सहायक कक्ष अधिकारी पदांसाठी महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त परीक्षा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेण्यात येते. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दिनांक २९ जुलै, २०२५ रोजी महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षेची जाहिरात प्रसिध्द केली. त्यामध्ये पोलीस उपनिरीक्षक पदाचा समावेश नव्हता. पोलीस महासंचालक कार्यालयाकडून दिनांक ६ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या पत्रान्वये पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या ३९२ पदांचे मागणीपत्र शासनास प्राप्त झाले. त्यास सामान्य प्रशासन विभाग व शासनाची मान्यता घेऊन दिनांक ११ ऑगस्ट, २०२५ रोजी पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या ३९२ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले.

(३) व (४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दिनांक १४ ऑगस्ट, २०२५ रोजी महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब संयुक्त पूर्व परीक्षेसंदर्भात शुध्दीपत्रक प्रसिध्द केले असून त्यामध्ये पोलीस उपनिरीक्षक सवर्गाच्या ३९२ पदांचा समावेश आहे. त्यानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दिनांक २१ डिसेंबर, २०२५ रोजी महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा-२०२५ घेण्याचे प्रस्तावित होते. सदर परीक्षा आता दिनांक ०४ जानेवारी, २०२६ रोजी घेण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात नदीकाठावरील पूर टापूतील शेतकऱ्यांसाठी सौर ऊर्जा योजना ऐच्छिक करण्याबाबत**

**(१३) * १७७४५ श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेती पंपासाठी नव्या वीज जोडण्या देण्यास वीज वितरण कंपनी नकार देत असून शेतीसाठी सौर ऊर्जा योजनेची सक्ती केली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही योजना सांगली जिल्ह्यातील कृष्णा, वारणा नदीकाठच्या पूर टापूत राबिविणे त्रासदायक असून कमी क्षेत्रातील शेतकऱ्यांना एवढी गुंतवणूक करणे परवडत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पूर टापूतील शेतकऱ्यांसाठी ही योजना ऐच्छिक करावी तसेच कमी क्षेत्रधारक शेतकऱ्यांवर या योजनेची सक्ती करु नये यासाठी शासानाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) शेती पंपासाठी शाश्वत सौरऊर्जेद्वारे दिवसा चालणाऱ्या सौर कृषी पंपाद्वारे नवीन विजजोडणी देण्याबाबत शेतकऱ्यांना ९०-९५ % अनुदानाद्वारे प्रोत्साहीत करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

याबाबत ग्रुप सामुहीक लघु उपसासिंचन योजने अंतर्गत एकापेक्षा जास्त शेतकऱ्यांना एकत्रित शासनातर्फे अनुदानाद्वारे सौर कृषी पंप देण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही

(४) पर्यावरणाचे रक्षण करणे, हरित उर्जेला प्रोत्साहन देणे असे उद्दिष्टे ठेऊन राज्यातील कृषिपंप वीज जोडण्याचे सौर ऊर्जेव्दारे वीजनिर्मिती करणेबाबत शासनाने ठरवून शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले जात आहे. शासन निर्णय १२.०५.२०२१ लाभार्थी निवडीच्या निकषानुसार, शेतकऱ्याकडे उपलब्ध असलेल्या जमीनीच्या क्षेत्रानुसार त्याला अनुदानावर मिळणाऱ्या पंपाची क्षमता ठरले. २.५ एकर पर्यंत भूधारणा असेल ३ एच.पी. क्षमतेचा, २.५१ ते ५ एकर भूधारणा असेल तर ५ एच.पी. क्षमतेचा व ५ एकर पेक्षा जास्त भूधारणा असेल तर ७.५ एच.पी. चा क्षमतेचा सौर कृषी पंप अनुदानतत्वावर शेतकऱ्याला मिळतो.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

**पनेवल (जि.रायगड) शहरातील पदपथावर तसेच रस्त्याच्या कडेला वितरणपेटया (डीपी) खुल्या असल्याबाबत**

**(१४) * १६३५६ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) शहरातील पदपथावर तसेच रस्त्याच्या कडेला खुल्या वितरणपेटया (डीपी) आढळून येत असून या वितरण पेट्यांमधून उच्चदाबाचा विद्युत पुरवठा होत असल्याने यावर झाकण नसल्याने मनुष्य व प्राणीहानी होण्याचा धोका निर्माण झाला असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पनवेल शहर, नवीन पनवेल, खारघर, कळंबोली व तळोजा येथे खाजगी मोबाईल टॉवरकरीता उभारलेल्या स्टेशनच्या वितरण पेटीही अनेक वेळा उघड्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी वितरण पेटींवर झाकणे लावणे, लोंबकळणाऱ्या वीज वाहिन्या ताणून घेणे, गंजलेले वीज खांब बदलणे यासंदर्भात वारंवार तक्रार करूनही महावितरणाकडून दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने विद्युत पुरवठा करणाऱ्या वितरण पेटींवर झाकण लावून अन्य उपाययोजना करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) वितरण रोहित्रांच्या वितरण पेट्यांना झाकणाने बंदिस्त केलेले असते. काही ठिकाणी जुन्या जीर्ण झालेल्या अथवा चोरी गेलेल्या झाकणांमुळे जर वितरण पेट्या उघड्या आढळल्या तर त्या वितरण पेट्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून महावितरण कंपनीमार्फत बंद करण्यात येतात.

पनवेल शहर उपविभागातील पनवेल-टक्का या गावाजवळील दरवाजा उघडा असलेला एका वितरण पेटीचा फोटो दिनांक १६ नोव्हेंबर, २०२५ रोजी दैनिक वृत्तपत्रात बातमीसहीत प्रसिध्द झाली होती. त्याची तात्काळ दखल घेऊन महावितरण कंपनीने त्याच दिवशी दिनांक १६ नोव्हेंबर, २०२५ रोजी सदरहू वितरण पेटीचा दरवाजा बंदिस्त करण्यात आला आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

पनवेल शहर, नवीन पनवेल, खारघर, कळंबोली, तळोजा यांचे परिसरामध्ये एकूण १०१७ खाजगी मोबाईल टॉवर आहेत. तेथील रोहित्रांची निगराणी सुरक्षा / देखरेख महावितरणतर्फे वेळोवेळी केली जाते.

तसेच, महावितरण कंपनीमार्फत नियमितपणे फीडर पिलरची झाकणे लावणे, लोबंकळणाऱ्या वीज वाहिन्या ताणून घेणे, गंजलेले वीज खांब बदलण्याची कामे करण्यात येतात.
(४) मागील तीन वर्षात पनवेल शहरात विविध योजनेतून ३६३ फीडर पिलर बदली करण्यात आलेले असून, ३७८.७७ कि.मी. च्या लोबंकाळणाऱ्या व जिर्ण झालेल्या वीज वाहिन्या बदलून घेण्यात आल्या असून, २०६० गंजलेले वीज खांब बदलून घेण्यात आलेले आहेत.

पनवेल शहर विभागात प्रतिबंधात्मक देखभालीकरीता १२ तसेच बिघाड दुरुस्तीकरीता १६ सूचीबद्ध कंत्राटदार नेमण्यात आलेले आहेत. सूचीबद्ध कंत्राटदारामार्फत देखभाल व दुरुस्तीच्या कामाअंतर्गत ३२९ फीडर पिलरचे दरवाजे बदली करण्यात आले. तसेच १४२७ गाळयामधील लोबंकळणाऱ्या वीज वाहीन्या ताणून घेण्यात आल्या.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य शासनाच्या विविध विभागातील पदे रिक्त असल्याबाबत

**(१५) * १६६२५ डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या मंत्रालयासह विविध विभागातील तीन लाख पदे रिक्त असून रिक्त पदांमुळे सध्याच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत राज्य शासनातील एकूण ७.१९ लाख मंजूर पदांपैकी विविध संवर्गातील सुमारे दोन लाख ९२ हजार ५७० पदे रिक्त असून नजीकच्या काळात सेवानिवृत्त होणाऱ्या ५ हजार २८९ इतक्या कर्मचाऱ्यांची संख्या यात समाविष्ट केली तर हा आकडा २ लाख ९२ हजार ८५९ इतका होणार असून राज्य शासनातील तब्बल ३५.८३ टक्के पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाच्या विविध विभागातील रिक्त पदे न भरल्याने काही अधिकाऱ्यांकडे दोन ते तीन पदांचा पदभार असल्यामुळे तसेच खालच्या पदावर नवी भरती न झाल्याने पदोन्नती होऊनही अनेकांना मागील दहा ते बारा वर्षे निम्न संवर्गातील पदावरच काम करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासकीय सेवेतील पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

सेवार्थ प्रणालीनुसार सद्यस्थितीत राज्य शासनाच्या विविध विभागामध्ये ८,१८,५०३ इतकी मंजूर पदे असून २,९९,०५१ म्हणजेच ३६.५४ टक्के इतकी पदे रिक्त आहेत.

(३) व (४) शासनाने ऑगस्ट, २०२२ ते नोव्हेंबर, २०२५ या कालावधीत शासकीय, निम-शासकीय व अनुकंपा तत्त्वावर एकूण १,२०,२३२ इतक्या नियुक्त्या केल्या आहेत.

शासनातील विहित पदांवर पदभरती ही सातत्याने चालणारी प्रक्रिया असून, नवीन पदनिर्मितीमुळे अथवा सेवानिवृत्तीमुळे रिक्त झालेल्या पदांवर पदोन्नती आणि सरळसेवा मार्गाव्दारे संबंधित प्रशासकीय विभागाकडून नियुक्त्या करण्यात येतात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील सांडपाणी समुद्रात सोडल्यामुळे होणारे प्रदुषण

**(१६) * १५८३२ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.देवराव भोंगळे (राजूरा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.कालिदास कोळंबकर (वडाळा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने हरित न्यायाधिकरणाकडे (NGT) सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रातील आकडेवारीनुसार मुंबईत दररोज सुमारे २,८१४ दशलक्ष लिटर सांडपाणी तयार होत असून त्यापैकी केवळ १,४७५ दशलक्ष लिटर पाणी शुद्ध केले जाते, तर उर्वरित सुमारे १,३३७ दशलक्ष लिटर पाणी थेट समुद्रात व खाड्यांत सोडले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प कार्यान्वित असले तरी बहुसंख्य प्रकल्प प्रदूषण मानकांचे पालन करण्यात अपयशी ठरले असून, वरळी शुद्धीकरण केंद्रात जैविक प्राणवायू मागणी (BOD) व स्थगित घनांश (SS) मूल्ये राष्ट्रीय मानकांच्या दहापट जास्त आढळल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे समुद्री जीवसृष्टी, खारफुटी (मॅन्ग्रोव्ह), किनारपट्टीचे पर्यावरणीय आरोग्य आणि मुंबईकरांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, समुद्रातील वाढत्या प्रदुषणामुळे किनारपट्टी परिसरात दुर्गंधी, जलजन्य आजारांचा प्रादुर्भाव वाढत असूनही स्थानिक प्रशासन व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने याबाबत कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे , हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सन २०२४-२५ या वर्षात १२८ चेतावणी पत्रे, ३९ कारणे दाखवा पत्रे, २२ प्रस्तावित आदेश, ४ बंदी आदेश व ४२ तात्पुरत्या कारवाया करण्यात आल्या असल्या तरी प्रदुषणामुळे जैवविविधतेवर होणारा परिणाम आटोक्यात आला नसून  प्रदूषण कमी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत बृहन्मुंबई महानगरपालिकेतील एकूण ७ सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पांना राष्ट्रीय मानांकापेक्षा सक्त मानांके नमूद करुन संमतीपत्र प्रदान करण्यात आले आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत मुंबई शहरातील सध्या कार्यान्वित ०७ सांडपाणी शुध्दीकरण प्रकल्पामधून निघणाऱ्या प्रक्रियाकृत सांडपाण्याचे पृथ्थ:करण केले जाते. सदर पृथ्थ:करण अहवालानुसार जैविक प्राणवायू मागणी (बीओडी) व स्थगित घनांश (एस एस) ची मूल्ये राष्ट्रीय मानांकापेक्षा काही प्रमाणात वाढल्याचे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निदर्शनास आले आहे.

वरळी येथील सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पाच्या प्रक्रियाकृत सांडपाण्याचे माहे जानेवारी, २०२५ ते ऑक्टोबर, २०२५ या कालावधीमधील पृथ्थकरण अहवालानुसार जैविक प्राणवायू मागणी (बी.ओ.डी.) व स्थगित घनांश (एस.एस.) सरासरी ४१.३६ मिग्रॅ/लिटर आणि ३६.५५ मिग्रॅ/लिटर इतकी आहे. सदर जैविक प्राणवायू मागणी (बी.ओ.डी.) ची सरासरी संमती पत्रातील मानांकाच्या (बी.ओ.डी. १० मिग्रॅ/लिटर) ४ पटीने तसेच स्थगित घनांश ची सरासरी संमती पत्रातील मानांकाच्या (एस.एस. २० मिग्रॅ/लिटर) १.६ पटीने वाढल्याचे आढळते.
(३) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अहवालानुसार मुंबई शहरासाठी मोडकसागर, अपर वैतरणा, मिडल वैतरणा व लोअर वैतरणा, भातसा, विहार व पवई या तलावातून पाणीपुरवठा होतो. सदर पाणी भांडूप व पांजरपोळ या जलशुद्धीकरण प्रकल्पात शुद्धीकरण करून मुंबईतील नागरिकांना पिण्यासाठी पुरविण्यात येते.

आरोग्य विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या अहवालानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीमध्ये जलजन्य आजारांच्या रूग्णसंख्येमध्ये लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून आले नाही.

कांदळवन कक्ष, मुंबई यांचेमार्फत प्राप्त अहवालानुसार मुंबईतील सांडपाण्यामुळे समुद्री जीवसृष्टी, खारफुटी (मँग्रोव्ह) यावर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले नाही.
(४) व (५) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत उद्योगांची वेळोवेळी पाहणी करण्यात येते व सदर पाहणी दरम्यान संमतीपत्रातील अटी व शर्तीचे उल्लंघन करणाऱ्या उद्योगाविरुद्ध आवश्यक ती कार्यवाही करण्यात येते.

माहे जानेवारी, २०२५ ते माहे ऑक्टोबर, २०२५ या दरम्यान प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई कार्यक्षेत्रातील एकूण ५५ उद्योगांना उत्पादन बंद करण्याचे निर्देश, एकूण २८ उद्योगांना अंतरिम निर्देश, एकूण १२५ उद्योगांना प्रस्तावित आदेश, एका उद्योगास प्रोसिक्युशन नोटीस, १२ उद्योगांना कारणे दाखवा नोटीस व एकूण ४ उद्योगांना काम थांबवा आदेश देण्यात आले आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत महानगरपालिका क्षेत्रातील दहिसर, पोईसर, ओशिवरा/ वालभट नद्यांचे प्रदूषण रोखण्याकरिता मलजल प्रक्रिया केंद्र उभारण्याची तसेच मिठी नदी प्रदूषण रोखण्याकरिताचे काम प्रगतीपथावर आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील मनोरंजन क्लबवर कारवाई करण्याबाबत

**(१७) * १६१९८ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.देवराव भोंगळे (राजूरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र-तेलंगणा सिमा भागातील पोडसा, बामणी, गडचांदूर, बल्लारपूर, तथा कोरपना येथे गोव्याच्या धर्तीवर मोठ्या प्रमाणात जुगार अड्डे सुरू असून, तेलंगणा व महाराष्ट्रातील १५० ते २०० मोठे व्यापारी येथे जुगार खेळण्यासाठी येत असून त्यांच्या जेवणाची देखील सोय केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर जिल्ह्यात तेलंगणातील एक व्यापारी ४० लाख रुपये एकाच दिवशी जुगारात हरल्यानंतर पोलिसांनी राजीव समाधान मल्टीपरपज सोसायटी या मनोरंजन क्लबवर माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये छापा टाकला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी राजीव समाधान मल्टीपरपज सोसायटी या 'मनोरंजन क्लब'चा परवाना स्थानिक पातळीवर रद्द करण्यात आल्यानंतर या क्लबच्या संचालकाने मंत्रालयातून परवाना मंजुरी मिळवली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.

मौजे पोडसा, ता. गोंडपिपरी येथे राजीव समाधान मल्टीपर्पज सोसायटी या आस्थापनेस, बामणी, ता. बल्लारपूर येथे विनर सोशल क्लब, चंद्रपूर, या आस्थापनेस तर गडचांदूर, ता. कोरपना, येथे रिगल सोशल क्लब या आस्थापनेस कार्ड रूम/कार्ड क्लब परवाना मंजूर करण्यात आलेला आहे.

मौजे पोडसा, ता. गोंडपिपरी येथील राजीव समाधान मल्टीपर्पज सोसायटी या कार्ड रूम/कार्ड क्लब आस्थापनेने अटी व शर्तींचे उल्लंघन केल्याने, त्यांचेविरूद्ध पोलीस स्टेशन लाठी येथे अप. क्र. २१/२०२५, भारतीय न्याय संहिता कलम २२३, २३८, २८९, २९२, ४९, ३(५) सह महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम, १८८७ कलम ४, ५ अन्वये दिनांक ०९ ऑगस्ट, २०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून, सदर गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

सदर आस्थापनेवरील कारवाईत तेलंगणातील एक व्यापारी ४० लाख रुपये एकाच दिवशी जुगारात हरल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या दिनांक ०२ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या आदेशान्वये सदर आस्थापनेचा कार्ड रूम/कार्ड क्लब परवाना तात्पुरता निलंबित करण्यात आला असून, सद्य:स्थितीत सदर कार्ड रूम/कार्ड क्लब आस्थापना बंद आहे.

चंद्रपूर जिल्ह्यात सदर आस्थापनांची पोलीस स्टेशन मार्फत नियमित तपासणी करून कुठलेही बेकायदेशीर कृत्य घडणार नाही याची दक्षता घेऊन अटी व शर्तींचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येते. अशाप्रकारे सन २०२५ मध्ये (ऑक्टोबर अखेर पर्यंत) चंद्रपूर जिल्हयात एकूण ५१६ गुन्ह्यात ७५५ आरोपींना अटक केली असून, रू. २२१५४४६०/- इतका मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात विजेच्या तारेच्या धक्क्यामुळे झालेल्या मृत्युबाबत

**(१८) * १९७०४ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मागील पाच वर्षांत विजेच्या तारेच्या धक्क्यामुळे पाच हजार ३१६ प्राणांतिक अपघात झाले असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विजेच्या तारेच्या धक्क्यामुळे निरपराध नागरिकांचा मृत्यू होत असताना विद्युत निरिक्षकांकडून सरसकट अपघाती मृत्यू म्हणून कार्यवाही केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी दोषी व्यक्तींविरोधात एकाही विद्युत निरिक्षकांकडून एफआयआर दाखल झाली नसल्याबाबतची तक्रार राज्य मानवी हक्क आयोगाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) राज्यात मागील पाच वर्षात विजेच्या धक्क्यामुळे एकूण ६८४८ मानवी प्राणांतिक अपघात झाले आहेत.
(२) हे खरे नाही.

विद्युत निरिक्षकांकडून चौकशीअंती विद्युत संच मांडणीतील दोषांमुळे मानवी प्राणांतिक आपघात झाला असल्यास, विद्युत संच मांडणीच्या मालकांस नुकसान भरपाईचे आदेश दिले जातात. मागील ५ वर्षात रू.२०.५४ कोटी इतकी नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.
(३) विद्युत निरीक्षकांना चौकशीदरम्यान साक्षीदारांना हजर राहण्यास, कागदपत्रे सादर करण्यास आणि भौतिक पुरावे गोळा करण्यास कोड ऑफ सिविल प्रोसिजर १९०८ (५ ऑफ १९०८) अंतर्गत सर्व कायदेशीर अधिकार प्राप्त आहेत. चौकशी अहवाल तयार झाल्यानंतर तो संबंधित वीज वितरण कंपनी व पोलिस अधिकारी यांच्याकडे पाठवला जातो. विद्युत निरीक्षक यांच्या अहवालाच्या आधारे पोलिस अधिकारी यांच्याकडून एफआयआर नोंदविण्यात येतो.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील ‘डिजिटल अरेस्ट’ आणि इतर सायबर गुन्हे रोखण्यासाठी करावयाची उपाययोजना

**(१९) * २१९१७ श्री.अबू आझमी (मानखुर्द शिवाजीनगर), श्री.रोहित पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ‘डिजिटल अरेस्ट’ या फसवणुकीच्या प्रकाराअंतर्गत एकूण २१८ हून अधिक गुन्हे माहे जुलै, २०२५ ते माहे ऑक्टोबर, २०२५ या कालावधीत नोंदविले गेले असून, रुपये ११२ कोटी इतक्या रकमेची फसवणूक झाली असल्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री तथा गृहमंत्री यांना दिनांक १ नोव्हेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान दिलेल्या निवेदनाद्वारे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गुन्ह्यांमध्ये मुंबईतील एका ७२ वर्षीय व्यावसायिकांची रूपये ५८ कोटी इतक्या रकमेची फसवणूक ही देशातील सर्वात मोठी फसवणूक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच शिवडी (मुंबई) येथे एका वृद्ध व्यक्तीला ‘डिजिटल अटके’त ठेवून ७० लाख रुपये आणि रायगड येथील एका वृद्धाला ‘NIA’ अधिकारी असल्याचे भासवून ४० लाख रुपये तर अमरावती शहरात एका निवृत्त बँक अधिकाऱ्याला व्हिडिओ कॉलवर पोलीस अधिकारी म्हणून ३१.५० लाख रुपयांची फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह ‘डिजिटल अरेस्ट’ आणि इतर सायबर गुन्हे त्वरित रोखण्यासाठी व नागरिकांची रक्कम परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे,

माहे जुलै, २०२५ ते माहे ऑक्टोबर, २०२५ या कालावधीमध्ये डिजीटल अरेस्ट फसवणूकी बाबत एकूण १४५ गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. सदर गुन्ह्यांमध्ये रू.१२९.६१ कोटी इतक्या रकमेची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) दिनांक १९ ऑगस्ट, २०२५ रोजी एका अनोळखी व्यक्तीने तक्रारदार यांना सीबीआय व न्यायालयाचे अधिकारी असल्याचे भासवून व्हाट्सअॅप व्हिडीओ कॉलवर त्याबाबतची खोटी कागदपत्रे दाखवून तक्रारदार यांना जेट एअरवेज कडून अवैधरित्या कमिशन आल्याने तक्रारदार व त्यांची पत्नी यांना दिनांक १९ ऑगस्ट, २०२५ ते दिनांक ०८ ऑक्टोबर, २०२५ पर्यंत घरात डिजिटल अरेस्ट केले असल्याचे सांगितले. तसेच त्यांच्या बँक खाते व मालमत्तेची तपासणी करायचे असल्याचे सांगून एकूण रूपये ५८,१३,५०,०००/- इतकी रक्कम RTGS द्वारे वेगवेगळया १८ बँक खात्यात हस्तांतरण करण्यास सांगून फसवणूक केल्याबाबत महाराष्ट्र नोडल सायबर पोलीस स्टेशन, मुंबई येथे गु.र.क्र. ४२/२०२५, भारतीय न्याय संहिताचे कलम ६१(२), ११२, १२६(२), २०४, २०५, ३०८(२), ३१६(२) ३१८ (४), ३३६(२), ३३६(३), ३३८, ३४०(२), ३५१(२) सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० चे कलम ६६ (क), ६६ (ड) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्यात ३२ आरोपींना अटक करण्यात आले असून सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(३) शिवडी (मुंबई) येथे एका वृद्ध व्यक्तीला डिजीटल अटकेत ठेवून रु.७० लाख रकमेच्या फसवणूकीबाबत आर.ए.किडवाई मार्ग पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३५८/२०२५, भारतीय न्याय संहिताचे कलम २०४, २०५, ३०८(२), ३०८(३), ३१८(२), ३१९(२), ३३६(२), ३४०(२), ३५१(२), ३(५), सह कलम ६६ (क), ६६ (ड) माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्यात ०६ आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

दिनांक ०४ मे, २०२४ रोजी तक्रारदार यांना व्हॉट्सॲप कॉलद्वारे अज्ञात व्यक्तीने टेलिकॉम रेग्युलेटरी ॲथॉरिटी ऑफ इंडिया व पोलीस डिपार्टमेन्ट मधून बोलत असल्याचे सांगून त्यांच्या विरुद्ध अटक वॉरंट असल्याची भिती घालून त्यांची रूपये ४०,७३,७१९/-इतक्या रक्कमेची फसवणूक केली. त्यानुषंगाने, अलिबाग पोलीस ठाणे, रायगड येथे गु.र.क्र. १३१/२०२४, भारतीय दंड विधान संहिताचे कलम ४२०, ३८४, १७०, ४१७, ४६५, ४६७, ४६८, ३४ सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० चे कलम ६६ (डी) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्यात ०७ आरोपींना अटक करण्यात आली असून सद्य:स्थितीत सर्व आरोपी जामीनावर आहेत.

अमरावती शहर येथील निवृत्त बँक अधिकारी यांची डिजिटल अरेस्टद्वारे रूपये ३१,५०,०००/-इतक्या रूपयांची फसवूणक झाल्याबाबत सायबर पोलीस ठाणे, अमरावती येथे गु.र.क्र. १४/२०२५, भारतीय न्याय संहिताचे कलम ३१८ (४), ३१९(२), ३५१ सह कलम ६६ (क), ६६ (ड) माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

(४) राज्य शासनाने सायबर फसवणुकीला बळी पडणाऱ्या नागरिकांना विशेषत: महिला, बालके व ज्येष्ठ नागरिकांना केंद्र स्थानी ठेवून अत्याधूनिक तंत्रज्ञान, कुशल मनुष्यबळ आणि संसाधनांनी युक्त अशा उपाय योजनांचा समावेश असलेल्या महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प कार्यान्वित केला आहे.

राज्यभरातील सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी महापे येथे नोडल सायबर पोलीस स्टेशन कार्यरत असून त्याद्वारे राज्यातील ५० जिल्हा सायबर लॅब्सच्या कार्यक्षमतेसाठी आणि तांत्रिकदृष्ट्या गुंतागंतीच्या सायबर गुन्ह्यांच्या तपासासाठी हे केंद्र कार्यरत आहे.

महाराष्ट्र सायबर कार्यालयाकडून २६ तज्ञ सल्लागारांच्या मदतीने राज्यातील १००० पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना Forensic Tools चे ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात आले आहे.

सर्व प्रकारचे सायबर गुन्हे रोखण्याकरीता www.cybercrime.gov.in ही वेबसाईट व सायबर हेल्पलाईन नंबर १९३० बाबत सर्व सामान्य जनतेत महाराष्ट्र सायबरच्या सोशल मिडीया Twitter, Instagram, Facebook, YouTube अकांउट- द्वारे जनजागृती करण्यात आली आहे.

तसेच राज्यातील ३४ रेल्वे स्थानकांवरून महारेल एलईडी/ एलसीडी स्क्रीनद्वारे सायबर गुन्ह्याबाबत प्रभावीपणे जनजागृती करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील काळाचौकी येथे अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याबाबत

**(२०) * २१९८१ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील काळाचौकी येथे १५ वर्षीय अल्पवयीन मुलीवर ६ जणांनी सातत्याने अत्याचार केला असून त्याचे चित्रीकरण केले असल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात काळाचौकी पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी कली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधिताविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) खरे आहे.

(२) खरे आहे.

(३) सदर प्रकरणी काळाचौकी पोलीस स्टेशन, मुंबई येथे आरोपींविरोधात गु.र.क्र.२६९/२०२५, कलम ६५(१), ७०(२), ३५१(२), ३ (५) भा.न्या.सं. सह कलम ४,८,१२ पोक्सो कायदा, २०१२ अन्वये दिनांक १० ऑगस्ट, २०२५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

गुन्ह्यातील आरोपी क्र.०१ याच्या विरोधात दिनांक ०८ ऑक्टोबर, २०२५ रोजी मा. सत्र न्यायालय, मुंबई येथे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे व सदर गुन्ह्यातील इतर ५ आरोपी हे विधी संघर्षग्रस्त बालक असल्याने त्यांच्या विरोधात दिनांक ०८ ऑक्टोबर, २०२५ रोजी मा. बाल न्यायालय, डोंगरी, मुंबई येथे दोषारोपपत्रे दाखल करण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## देवनार, मुंबई येथे खाजगी वाहनचालकाने परिवहन अधिकाऱ्यांचा गणवेश परिधान करुन अवैध वसुली केल्याबाबत

**(२१) * २१४६४ श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई येथील परिवहन अधिकारी श्री. सचिन पाटील यांनी स्वतःच्या खाजगी गाडीच्या वाहन चालकास परिवहन अधिकाऱ्याचा शासकीय गणवेश घालून त्याच्याजवळ चलानची मशीन देऊन मुंबईतील देवनार परिसरातील वाहनचालकांकडून मोठ्या प्रमाणात अवैध वसुली केली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गंभीर प्रकरणाची तक्रार करून देखील संबंधित परिवहन अधिकारी श्री. सचिन पाटील व त्यांच्या वाहन चालकावर अद्यापही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गंभीर प्रकरण फौजदारी स्वरूपाचे असल्याने याबाबत शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :**(१) (२) व (३) श्री.सचिन पाटील, मोटार वाहन निरीक्षक हे दिनांक २८ मे, २०२५ रोजी शासकीय वाहन क्र.एम.एच.०४ के.आर.६४७७ ह्या वाहनावर अंमलबजावणी वायुवेग पथक-१ अंतर्गत, देवनार मुंबई येथे कार्यरत होते. याबाबत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने परिवहन आयुक्त यांच्या दिनांक ०५ जून, २०२५ रोजीच्या पत्रान्वये श्री. सचिन पाटील, मोटार वाहन निरीक्षक, परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांच्याकडील अंमलबजावणीचे कामकाज काढण्यात आले असून त्यांना अकार्यकारी स्वरुपाचे कामकाज सोपविले आहे. तसेच सदर प्रकरणी कर्तव्यात हयगय / हलगर्जीपणा करणाऱ्या संबंधित अधिकारी व नियंत्रक अधिकारी यांचेविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई बाबतचा प्रस्ताव कार्यवाहीखाली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जालना महानगरपालिकेच्या आयुक्तांनी लाच स्वीकारल्याबाबत

**(२२) * १५७३९ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना महानगरपालिकेचे आयुक्त यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ACB) तक्रारदाराकडून रुपये १० लाख स्वीकारताना पकडल्याची व त्यानंतर अटक केल्याची घटना माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी आयुक्तांच्या शासकीय निवासस्थानी/कार्यालयात पंचासमक्ष झडती घेऊन कागदपत्रे, रोख रक्कम व अलीकडील निविदा, कार्यादेश व देयक मंजुरींची नोंद जप्त करण्यात आली असल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने नोंदविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच संबंधित प्रकरणात तक्रारीनुसार यापूर्वीही कामकाज आदेश/देयक मंजुरीसाठी मोठी रक्कम मागितली असल्याचा उल्लेख करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्याचे तात्काळ निलंबन करुन, त्याच्या विरुद्ध विभागीय चौकशी सुरु करण्यासह मागील ६ ते १२ महिन्यांतील सर्व ठेके, देयक मंजुरी व कामकाज आदेशांचे विशेष लेखापरीक्षण (Special Audit) करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी आलोसे यांच्या शासकीय निवासस्थान, मोतीबाग, जालना येथील राहत्या घराच्या घरझडती दरम्यान २१ तोळे सोने तसेच २ किलो ७८७ ग्रॅम चांदीचे दागिने व रोख रक्कम रु.५,२०,०००/- मिळून आली आहे. तसेच आलोसे यांच्या घरझडती दरम्यान मिळून आलेले मालमत्ते संबंधीचे व इतर कागदपत्रे जप्त करण्यात आली आहेत, ही बाब खरी आहे.

(३) आलेसे आयुक्त तथा प्रशासक, जालना महानगरपालिका यांनी वाल्मिक नगर (गांधीनगर) पुल ते रिंग रोड पर्यत सीसी रोड व डीपी रोड बांधकाम करण्याच्या कामाचे उर्वरित रूपये ९०,००,०००/- व उर्वरीत कामांचे रेकॉर्ड होणारे रूपये १,६०,००,०००/- इतके रकमेचे देयक अदा करण्यासाठी गुन्हयातील मूळ तक्रारदार यांचेकडून यापूर्वी रूपये ४०,००,०००/- स्विकारल्याचे मान्य करुन गुन्हयातील मुळ तक्रारदार यांना रूपये २०,००,०००/- रुपयाची लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रु.१०,००,०००/- इतकी रक्कम स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

(४) I. प्रस्तुत प्रकरणी, लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे, आयुक्त तथा प्रशासक जालना महानगरपालिका, जालना यांना तक्रारदार यांच्याकडून रु.१०,००,०००/- इतकी लाचेची रक्कम स्विकारताना पंचासमक्ष रंगेहात पकडण्यात आले आहे. त्यानुषंगाने, त्यांच्याविरुद्ध पोलीस ठाणे कदीम जालना येथे गु.र.नं. ४४०/२०२५ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ प्रमाणे दिनांक १७ ऑक्टोबर, २०२५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. त्याच दिवशी आलोसे यांना अटक करण्यात आली आहे. अद्यापपोवेतो आलोसे हे जिल्हा कारागृह, जालना येथे न्यायालयीन कोठडीमध्ये आहे.

II. दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने, आलोसे यांना दिनांक २१ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या आदेशान्वये शासन सेवेतून निलंबित करण्यात आले असून त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशीची कार्यवाही प्रस्तावित आहे.

III. लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत आलोसे यांच्या अपसंपदेसंबंधी उघड चौकशीबाबत कार्यवाही करण्याची तजवीज ठेवण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नंदुरबार जिल्ह्यात आदिवासी युवकाचा खून झाल्याप्रकरणी आरोपीला अटक करण्याबाबत

**(२३)** * **२१४९७ डॉ.विजयकुमार गावित (नंदुरबार) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी युवकाचा खून झाल्याप्रकरणी पोलिसांनी खऱ्या आरोपीला न पकडता कामावर येणारे कामगार, परीक्षा देणारी विद्यार्थी आणि इतर समाजसेवक यांना अटक केल्यामुळे आदिवासी संघटनांकडून दिनांक २४ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान नंदुरबार येथे मूक मोर्चा काढण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी उपनगर पोलीस ठाण्याचे प्रभारी यांनी मुख्य आरोपीला न पकडता पळून जाण्यास केलेली मदत, इतर आरोपींना अटक न करता मोठ्या प्रमाणात केलेले आर्थिक व्यवहार तसेच मुख्य आरोपीबरोबर पोलिसांचे झालेले बोलणे आणि कोणताही पुरावा मागे राहू नये म्हणून पोलिसांनी मुख्य आरोपीच्या भ्रमणध्वनीमधील माहिती नष्ट (Mobile Formate) केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार संबंधित दोषींविरुद्ध कारवाई करण्यासह निरपधारांची निर्दोष मुक्तता करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे, अंशत: खरे आहे.
आदिवासी संघटनाकडून दिनांक २४ सप्टेंबर, २०२५ रोजी नंदुरबार येथे मूक मोर्चा काढण्यात आला होता.
(२) व (३) हे खरे नाही,
उपनगर पोलीस ठाणे गु.र.न. २५८/२०२५ BNS कलम १०३ (१),१०९,३५२,३५१(१) (३),४९,३ (५) सह अनुसूचीत जाती जमाती कायदा १९८९ चे सुधारणा अधिनियम २०१५ चे कलम ३(१) (r),३(१) (s),३(२) (va) प्रमाणे सदर गुन्ह्यातील मुख्य आरोपीस दिनांक १७ सप्टेंबर, २०२५ रोजी अटक करण्यात आली आहे. तसेच अन्य एक आरोपी हा जिल्हा पोलीस दलातील पोलीस कर्मचारी असताना व सदर घटनास्थळी घटना घडत असतांना उपस्थित असून देखील गुन्ह्यास प्रतिबंध करण्यात हस्तक्षेप केला नाही, म्हणून त्यास सदर गुन्ह्यामध्ये सह आरोपी करण्यात आले. तसेच त्यास दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ रोजी अटक करण्यात आली आहे व त्यास दिनांक १५ ऑक्टोबर, २०२५ रोजी नंदुरबार पोलीस दलातून बडतर्फ केले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रहेमतनगर (ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर) येथे गोवंश जातीचे मांस व वाहने जप्त केल्याबाबत

**(२४) * २०३९७ श्री.अमोल खताळ (संगमनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर पोलीस उपाधीक्षकांच्या विशेष पथकाने संगमनेर शहरातील रहेमतनगर परिसरात माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये छापा टाकून गोवंश जातीचे मांस तस्करी करताना जप्त केले असून या कारवाईत सुमारे १७ लाख रुपयांचे गोमांस आणि २ वाहने जप्त करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात आरोपीं विरोधात महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम आणि भारतीय न्याय संहितेतील कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) दिनांक ११ ऑक्टोबर, २०२५ रोजी रहेमतनगर (ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर) परिसरात छापा टाकून गोवंश जातीचे मांस व २ वाहने जप्त करण्यात आली असून, या कारवाईत सुमारे १७ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच सदर प्रकरणातील आरोपींविरुद्ध संगमनेर शहर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ९०३/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम २७१, ३२५, ३(५) सह प्राणी छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० चे कलम ५, ५(क), ९, ९(अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे.

-----------------

## राज्यातील उद्वाहन परवान्याच्या केंद्रीकरणामुळे अडचणी येत असल्याबाबत

**(२५) * १६०९४ श्री.धनंजय मुंडे (परळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व उद्वाहन परवाने देण्याचे अधिकार केंद्रित करून मुंबई येथूनच दिले जात असल्यामुळे संपूर्ण राज्यातील व्यावसायिकांना उद्वाहन परवाना मिळवण्यासाठी अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जुलै, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर केंद्रीकरणामुळे अहिल्यानगर, औरंगाबाद, नाशिक, कोल्हापूर व अकोला यांसारख्या जिल्ह्यांतील व्यावसायिकांना परवाना मिळवण्यासाठी वेळ व खर्च अधिक होत असून तसेच संबंधित परवाने वेळेत मिळत नसल्यामुळे प्रकल्प प्रलंबित राहून गुंतवणुकीवर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी राज्य शासनाने उद्वाहन परवाना प्रक्रियेचे विकेंद्रीकरण न करता मुंबईच्या एका निरीक्षकाच्या हाती संपूर्ण राज्याचा भार टाकल्याने परिणामी कामात त्रुटी, कारभारात विलंब व अपारदर्शकता वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच सन २०१७ मध्ये तयार करण्यात आलेल्या उद्वाहन परवाना नियमावलीतूनच सदर अडचण निर्माण झाली असून त्यात सुधारणा करून नवीन नियमावली तयार करण्यात शासन अपयशी ठरले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर उद्वाहन परवाना प्रक्रियेच्या केंद्रीकरणाच्या धोरणामागची भूमिका काय आहे तसेच सदर प्रक्रियेमुळे निर्माण झालेल्या अडचणींबाबत शासनाने सखोल चौकशी करुन त्या अनुषंगाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) सद्य:स्थितीत लागू असलेल्या महाराष्ट्र उद्वाहन अधिनियम, १९३९ अंतर्गत शासन अधिसूचना दिनांक २८ एप्रिल, २०२५ अन्वये उद्वाहन परवाना देण्याबाबतच्या कामकाजाचे विकेंद्रीकरण करण्यात आले आहे. शासनाची सदर विकेंद्रीकरणाची भूमिका विचारात घेवून विधी व न्याय विभागाच्या सल्ल्याने महाराष्ट्र उद्वाहन, सरकते जिने व सरकते मार्ग अधिनियम, २०१७ मध्ये आवश्यक दुरुस्ती करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. सदर दुरूस्ती अधिनियम लागू झाल्यानंतर या अधिनियमांतर्गतचे नियम अधिसूचित करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.
(५) उद्वाहन परवाना देण्याबाबतच्या कामकाजाचे ऊर्जा विभागाच्या शासन अधिसूचना दिनांक २८ एप्रिल, २०२५ अन्वये विकेंद्रीकरण करण्यात आले आहे. त्यानुसार प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ व जिल्हा विद्युत निरीक्षण कार्यालयस्तरावर अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. यापूर्वी उद्वाहनच्या कामकाजाकरीता २ विद्युत निरीक्षक (उद्ववाहन) व इतर ६९ तांत्रिक पदे मंजूर होती. अधिकाधिक उद्वाहनाचे वार्षीक निरीक्षण करण्यासाठी जास्तीचे मनुष्यबळ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने विकेंद्रीकरण करण्यात आले आहे यामुळे तांत्रिक अधिकाऱ्यांची एकूण ५१९ इतकी मंजूर पदे उपलब्ध झाली आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पो.स्टे. दिंद्रुड (ता.माजलगाव, जि.बीड) येथील सहायक पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक यांच्या विरोधातील तक्रार निवेदनाबाबत

**(२६) * १७८९३ श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पो.स्टे.दिंद्रुड (ता.माजलगाव, जि.बीड) येथील सहायक पोलीस निरीक्षक (API) व पोलीस उपनिरीक्षक (PSI) हे वाळु चोरी करणाऱ्या व्यक्तींकडून हप्ता घेत असल्याबाबतचे निवेदन पोलीस अधिक्षक, बीड यांना स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १९ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी पोलीस अधीक्षक, बीड यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी, माजलगाव जि.बीड यांना चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

सदरच्या आशयाचे श्री. प्रकाश सुंदरराव सोळंके, मा. विधानसभा सदस्य यांचे दिनांक १९ ऑगस्ट, २०२५ रोजीचे पोलीस अधिक्षक, बीड यांना अग्रेषित केलेले निवेदन प्राप्त आहे.

(२) होय, हे खरे आहे.

पोलीस अधिक्षक, बीड यांच्या कार्यालयाचे दिनांक २१ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या आदेशान्वये उपविभागीय पोलीस अधिकारी, माजलगाव यांना चौकशी अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(३) होय, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे.

(४) श्री. प्रकाश सुंदरराव सोळंके, मा. विधानसभा सदस्य यांचे निवेदन व त्यासोबतच्या अर्जदार यांनी दिलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली असून चौकशीत खालील बाबी निष्पन्न झालेल्या आहेत.

अ) पोलीस अधिक्षक, बीड यांच्या आदेशान्वये ऑपरेशन ऑल आऊट दरम्यान दिनांक २४ जुलै, २०२५ रोजी रात्री अर्जदार श्री. तुकाराम सर्जेराव भोजने यांची गाडी संशयीतरित्या मिळून आल्याने व त्यांनी कागदपत्रे न दाखवल्याने स.पो.नि. श्री. ढाकणे यांनी अर्जदार यांची गाडी पो.स्टे. दिंद्रुड येथे जमा केली व त्याबाबत स्टेशन डायरीमध्ये नोंद सुध्दा करण्यात आली होती. तद्नंतर अर्जदार यांनी गाडीचे कागदपत्रे फोनवर मागवून घेतल्याने खात्री झाल्यानंतर अर्जदार यांची गाडी सोडून देण्यात आली आहे. यावरुन अर्जदारांनी नमूद केल्याप्रमाणे पोलीसांनी ७०,०००/- रु. घेतल्याचे दिसून येत नाही.

ब) तसेच अर्जदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जात नमूद केल्याप्रमाणे त्यांचे मित्र श्री. अनसुद्दीन शेख यांच्याकडून पोलीसांनी ८०००/- रु. रोख घेतल्याबाबत श्री. अनसुद्दीन शेख यांचे जबाब घेतले असता त्यांनी हकीकत सांगितली की, दिनांक १२ ऑगस्ट, २०२५ रोजी पोलीसांच्या बोलेरो जीप मध्ये असलेल्या पोलीसाने मला आडवून २०,०००/- रु. दंड भरावयास सांगितल्याने माझ्या जवळील ८,०००/- रुपये दिले. त्यावेळेस ते पोलीस कोण होते हे साक्षीदार अनसुद्दीन शेख यांना माहित नसुन अर्जदार श्री. भोजने यांनी अनसुद्दीन शेख यांना पैसे घेणारे पी.एस.आय श्री. सलमान शेख होते याबाबत खोटी माहिती दिली होती. या गाडीबाबत चौकशी केली असता तशी कोणतीही गाडी मिळालेली नाही. अथवा तेथील वाहन चालकाचा काहीही संबंध नसल्याचे निदर्शनास आले.

अर्जदार श्री. तुकाराम भोजने यांचेसोबत सदरची घटना दिनांक २४ जुलै, २०२५ रोजी घडली असतांना सुध्दा अर्जदार यांनी विचार करुन व साक्षीदार अनसुद्दीन यांना खोटी माहिती देवून दिनांक १५ ऑगस्ट, २०२५ रोजी मा.श्री. प्रकाश सोळंके, विधानसभा सदस्य यांच्याकडे तक्रार अर्ज केला आहे.

तसेच स.पो.नि. श्री. महादेव ढाकणे यांनी त्यांच्याबाबत अर्जदारांनी केलेले आरोप खोटे असल्याचे तसेच अर्जदार हे स्वत: अवैध गुटखा विक्री करणारे असून त्यांनी पोलीस प्रशासनावर दाब टाकण्यासाठी सदरचा खोटा अर्ज केल्याचे कळविले आहे.

एकंदरीतच अर्जदार यांनी केलेल्या तक्रारीबाबत काहीही ठोस पुरावे समोर आलेले नाहीत अथवा आरोप निष्पन्न झालेले नाही. तसेच अर्जदार यांनी विचार करुन पोलीस यंत्रणेवर दबाव यावा व पोलीस दलाचे मनोबल खचावे या दृष्टीकोनातुन सदरचा तक्रार अर्ज दिला असल्याचे चौकशीत निष्पन्न झालेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यात पोलिस पाटील संवर्गाची पदे भरण्याबाबत

**(२७) * २०१७९ श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यात ग्राम पातळीवरील पोलिस पाटील पदांच्या भरतीसाठी राज्य शासनाकडून आरक्षण निकषांबाबतचे अंतिम मार्गदर्शन न मिळाल्यामुळे पोलिस पाटील पदांवरील नियुक्ती सहा महिन्यांहून अधिक काळापासून स्थगित ठेवण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलढाणा जिल्हा उपविभागानुसार एकूण २९१ पदे रिक्त असून यामुळे ग्रामीण भागातील कायदा अंमलबजावणी, गाव पातळीवरील गुप्त माहिती संकलन व तातडीच्या शासकीय कृतींमध्ये गंभीर अडथळे निर्माण होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, इतर जिल्ह्यांमध्ये पोलिस पाटील भरती प्रक्रिया पूर्ण होऊन ते कार्यरत झालेले असताना फक्त बुलढाणा जिल्हा आणि काही उपविभागांमध्येच भरती प्रक्रियेस विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पोलिस पाटील नसल्यामुळे अनेक गाव पातळीवरील लहान गुन्ह्यांपासून ते सामाजिक व वाद व्यवस्थापनातील तक्रारी थेट पोलिस स्टेशनपर्यंत पोहोचत नसल्याची नोंद झाली असून त्यामुळे कायदा-सुव्यवस्था बळकट करण्यासाठी अंतरिम स्वरूपात "तात्पुरते पोलिस पाटील" किंवा "ग्राम रक्षक" नेमण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

पोलीस पाटीलाच्या नियुक्तीसाठी गृह विभागाने दिनांक १६ ऑक्टोबर, २००८ अन्वये आरक्षण लागू केले आहे. तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ च्या शासन निर्णयानुसार सामाजिक व शैक्षणिक (आर्थिक) मागास वर्गाकरिता आरक्षणासाठी बिंदुनामावलीच्या अनुषंगाने मार्गदर्शन दिनांक ०६ मे, २०२५ रोजीच्या पत्रान्वये करण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.

बुलढाणा जिल्ह्यात पोलीस पाटील यांची ५१८ पदे रिक्त असून यामुळे ग्रामीण भागातील कायदा अंमलबजावणी, गाव पातळीवरील गुप्त माहिती संकलन व तातडीच्या शासकीय कृतीमध्ये गंभीर अडथळे निर्माण होत असल्याबाबत अशी कुठलीही तक्रार जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा यांच्याकडे प्राप्त नाही.
(३) हे खरे नाही.

जिल्हाधिकारी, बुलढाणा कार्यालयाने दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये शासनाचे पुन:श्च मार्गदर्शन अपेक्षिलेले आहे. त्यानुषंगाने मार्गदर्शन देण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) पोलीस पाटील यांचे पद रिक्त असल्यास सदर पदाचा प्रभार इतर पोलीस पाटील यांना देण्यात येत असून प्रभारी पोलीस पाटील यांचेमार्फत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याची कार्यवाही करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र राज्य परिवहन विभाग व राज्य सीमा शुल्क विभाग यांच्या संयुक्त तपासणीबाबत**

**(२८) * १७८५० श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देशातील १८ राज्यांनी राज्य सीमा तपासणी नाके बंद केल्यानंतर राज्याच्या परिवहन विभागानेही राज्यातील सर्व २२ सीमा नाके बंद करण्याचा प्रस्ताव माहे मे, २०२५ मध्ये राज्याचे मा. मुख्यमंत्री यांच्याकडे पाठविला असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य परिवहन विभाग व राज्य सीमा शुल्क विभाग यांच्या संयुक्त तपासणीसाठी 'इंटिग्रेटेड चेक पोस्ट' (ICP) प्रकल्प राबविण्यासाठी एका नामांकित खाजगी संस्थेची नेमणूक करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदानी रोड ट्रान्सपोर्ट लिमिटेड यांनी सद्भाव इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्ट्स लिमिटेडकडून महाराष्ट्र राज्याच्या सीमेवरील व अन्य प्रमुख मार्गांवरील २२ तपासणी नाक्यांचे अधिग्रहण केले व व्यावसायिक वाहनांवरून शुल्क वसूल करण्याचा अधिकार प्राप्त केला असून सदर करार एकूण १६८० कोटी रुपयांचा असल्याचे माहे ऑगस्ट,२०२१ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, इंटिग्रेटेड सीमा तपासणी नाके बंद करण्याच्या निर्णयामुळे संबंधित खाजगी संस्थेला ५०४ कोटी रुपये नुकसानभरपाई देण्यास परिवहन विभागाने मान्यता दिली असून संबंधित खाजगी कंपनीने २३०४ कोटी रुपयांचा नफा कमावूनही परिवहन विभागाकडे सुमारे ७५०० कोटी रुपयांची नियमबाह्य मागणी केली असून त्याबाबत शासनाने कोणती चौकशी केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, सीमा नाके बंद झाल्यास सुमारे ५०० कोटी रुपयांचा वार्षिक महसूल कमी होण्याची शक्यता असताना वाहतूक सुलभ होण्यासाठी सीमा नाके बंद करण्याचा निर्णय घेतला असला तरी, इतर राज्यांतून येणाऱ्या जादा वजनाच्या वाहनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे ,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) याबाबत तत्वत: मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव मा.मुख्यमंत्री महोदयांना सादर करण्यात आला होता.
(२) होय.
(३) हे अंशतः खरे आहे.
(४) परिवहन विभागाने संबंधित घटकाला दिलेल्या नोटीसच्या अनुषंगाने संबंधित घटकाने दिलेल्या खुलाश्यामध्ये रक्कम रु. ७५०० कोटी चा उल्लेख आहे.
(५) व (६) केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ चे नियम १६७-अ नुसार इलेक्ट्रॉनिक पध्दतीने देखरेख व अंमलबजावणी करण्यारिता सुधारणा करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने एकात्मिक वाहतूक व्यवस्थापन प्रणाली प्रकल्प (ITMS) राज्यामध्ये उभारण्यात येत आहेत. परिवहन विभागाकडे २६३ इंटरसेप्टर वाहने कार्यरत असून वायुवेग पथकाच्या माध्यमातून संनियंत्रण करण्यात येत आहे. तसेच, नवीन ६९ वाहने विभागाला प्राप्त झाली आहेत. त्याद्वारे देखील याबाबत नियंत्रण करणे शक्य होणार आहे.

-----------------

## डॉ. नरेंद्र दाभोलकर व कॉ.गोविंद पानसरे यांच्या हत्येच्या मुख्य सुत्रधारांना पकडण्याबाबत

**(२९) * १५८३९ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष, डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येच्या मुख्य सूत्रधारांना पकडण्यासाठी शासनामार्फत कोणताही प्रयत्न केला जात नसल्याचा डॉ. हमीद दाभोळकर यांनी दिनांक १३ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे. हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डॉ.दाभोलकर यांच्या १२ व्या स्मृतिदिनानिमित्त दिनांक २० ऑगस्ट, २०२५ रोजी अंधश्रद्धा निर्मूलन समितीने सूत्रधारांना पकडण्याची मागणी करीत ठिकठिकाणी आंदोलने केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्यासह कॉ.गोविंद पानसरे यांच्याही खुनांमागील सूत्रधारांवर अद्याप कारवाई होऊ शकलेली नसून, सदर प्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाने (CBI) आजतागायत मा.उच्च न्यायालयात दाद

मागितलेली नाही तसेच त्यासाठी राज्य शासनाने देखील कोणताही प्रयत्न वा पाठपुरावा केला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशतः खरे आहे,

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष, डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येच्या संदर्भात डॉ. हमिद दाभोळकर यांनी दिनांक १३ ऑगस्ट, २०२५ रोजी पत्रकार भवन, नवी पेठ, पुणे येथे पत्रकार परिषद घेण्यात आली होती.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दिनांक ०९ मे, २०१४ रोजीच्या आदेशान्वये डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या खूनाचा तपास केंद्रीय अन्वेषण विभागाकडे (CBI) वर्ग करण्यात आलेला आहे. CBI ही स्वायत्त तपास संस्था असून, ती मा. न्यायालयाचे आदेश व तिच्या अंतर्गत कार्यप्रणालीप्रमाणे न्यायालयात अर्ज करत असतात.

तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दिनांक ०३ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या आदेशान्वये कॉ. गोविंद पानसरे यांच्या खूनाचा तपास दहशतवाद विरोधी पथक (ATS) महाराष्ट्र राज्य यांच्याकडे वर्ग केलेला आहे.

नमूद गुन्ह्यातील मुख्य आरोपी यांनी कट रचून एक वेगळा गट तयार करून स्वतंत्र बैठका, प्रशिक्षण देण्याचे काम केल्याचे व इतर अटक आरोपींच्या सहभागातून गुन्हा केल्याचे पुराव्यावरून निष्पन्न झाले आहे. सदर गुन्ह्याच्या तपासात १० अटक आरोपी व २ पाहिजे/फरार आरोपींविरुद्ध एकूण ५ दोषारोप पत्रे दाखल केली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जालना जिल्ह्यातील महावितरणच्या एनएससी सोलर कनेक्शन योजनेत झालेला गैरव्यवहार

**(३०) * १५९३३ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यात महावितरणकडून राबविण्यात येणाऱ्या एनएससी सोलर कनेक्शन योजनेंतर्गत नियमानुसार प्रवेश नोंद न घेता व प्रक्रियाचा भंग करून ९ महिन्यांत तब्बल १२० रोहित्रास मंजुरी देण्यात आल्याची माहिती माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित मंजुरी प्रक्रियेत शेतकऱ्यांकडून कंत्राटदारांमार्फत अतिरिक्त व बेकायदेशीर स्वरूपात रक्कम आकारण्यात आल्याची तक्रार प्राप्त झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेंतर्गत तांत्रिक पात्रतेचा अभाव, कागदपत्र तपासणीतील अनियमितता तसेच एनर्जी ऑडिट न करता मंजुरी देण्यात आल्याने शासनाच्या निधीचा अपव्यय झाला असल्याचे महावितरणच्या अंतर्गत चौकशीत आढळून आले आहे काय, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह शेतकऱ्यांकडून वसूल करण्यात आलेली जादा रक्कम परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

महावितरणकडून राबविण्यात येणाऱ्या योजनेअंतर्गत, एनएससी सोलर कनेक्शन या नावाची कोणतीही योजना अस्तित्वात नाही. परंतु, महावितरण कंपनीमार्फत "मागेल त्याला सौर पंप योजना" व "सोलर रुफ टॉप" या योजना सद्य:स्थितीत राबविण्यात येत आहेत.

तसेच एनएससी योजनेअंतर्गत (शेती पंप वगळता) औद्योगिक, व्यावसायिक व घरगुती नवीन वीज कनेक्शन वितरीत करण्यासाठी आजपर्यंत जालना विभाग क्र. १ अंतर्गत एकूण ५१ अंदाजपत्रके तर जालना विभाग क्र. २ अंतर्गत एकूण ८३ अंदाजपत्रके असे जालना मंडळाअंतर्गत एकूण १३४ अंदाजपत्रके मंजूर करण्यात आलेली आहेत. सर्व रोहित्रे नवीन वीज कनेक्शन एनएससी योजनेअंतर्गत वितरीत करतांना आवश्यक मंजूरी नियमानुसार व सर्व प्रक्रियेचे पालन करुन देण्यात आली असून, आतापर्यंत एकूण ११५ रोहित्रास मंजुरी देण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

संबंधित मंजुरी प्रक्रियेत शेतकऱ्यांकडून (ग्राहकाकडून) कंत्राटदारमार्फत अतिरिक्त व बेकायदेशीर स्वरुपात रक्कम आकारण्यात आल्याची कोणतीही लिखित तक्रार महावितरण कंपनीच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडळ व जालना विभागात प्राप्त झालेली नाही.

(३) हे खरे नाही.

सदर योजनेत अंदाजपत्रकाला मंजूरी देताना तांत्रिक पात्रतेचे पालन करुन तसेच ग्राहकाच्या कागदपत्राची योग्य तपासणी करुनच दिलेली आहे. तसेच अंदाजपत्रक बनवितांना तांत्रिक सुसाध्यता पाहूनच मंजूरी देण्यात आलेली आहे. तसेच सर्व अंदाजपत्रके ही एनएससी योजनेच्या आर्थिक तरतुदीच्या उपलब्धतेनुसारच (Available Budget) मंजूर करण्यात आलेली आहे.

(४) महावितरण कंपनीच्या कार्यालयात कुठलीही तक्रार प्राप्त झालेली नसल्याने याप्रकरणी चौकशी करण्यात आलेली नाही. तथापि, सदर कामाची चौकशी करण्यासाठी जालना विभाग क्र. १ व जालना विभाग क्र. २ यांनी दिनांक २५ नोव्हेंबर, २०२५ नुसार दोन स्वतंत्र समित्या गठीत केल्या असून, सदर समित्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर महावितरण कंपनीच्या नियमानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जालना जिल्ह्यात उपोषण करणाऱ्या कार्यकर्त्यास उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी मारहाण केल्याबाबत

**(३१) * १८३८७ श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यात स्वातंत्र्यदिनी पालकमंत्री ध्वजारोहनाकरीता आले असता त्यांच्या भेटीकरीता गेलेल्या व उपोषण करणाऱ्या श्री.अमित चौधरी व श्री.गोपाल चौधरी यांना ताब्यात घेण्याऐवजी पाठीमागून लाथ मारली असल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी पोलीस अधिकाऱ्याने केलेल्या कृती संदर्भात मानवाधिकार आयोगाने माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये पोलीस अधीक्षक, जालना यांना नोटीस पाठविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित पोलीस अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यासह संबंधित व्यक्तीला न्याय देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर घटनेच्या वेळी निर्माण झालेली परिस्थिती व बंदोबस्तातील पोलीसांचे जिवीताचे रक्षण करण्यासाठी आंदोलनकर्त्यांना बळाचा वापर करुन ताब्यात घेताना आंदोलनकर्त्यास लाथ मारतेवेळेसचा व्हिडीओ समाजमाध्यम व प्रसारमाध्यमांवर प्रसारित झाला ही बाब खरी आहे. तथापि, प्रसारित व्हिडीओ मधील दृश्याची मूळ व परिपूर्ण व्हिडीओ प्राप्त झालेले नसून लाथ मारल्याचे उप विभागीय पोलीस अधिकारी यांनी नाकारलेले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणात, अपर पोलीस अधीक्षक, जालना, यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालाची पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या स्तरावर तपासणी करण्यात येत आहे. सदर चौकशी अहवालातील निष्कर्षअंती पुढील कार्यवाही करण्याची तजवीज ठेवण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील पोलीस दलातील अधिकारी / कर्मचारी यांना स्व-मालकीची घरे देण्यासह पोलीस वसाहतींचा पुनर्विकास करण्याबाबत**

**(३२) * १७९११ श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.विलास भुमरे (पैठण), श्री.तुकाराम काते (चेंबूर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलीस दलातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी राज्य शासनाने "पोलीस हाऊसिंग टाऊनशिप" प्रकल्प हाती घेतला असून, मुंबई शहरातील पोलीस ठाण्याच्या आवारात तसेच ७५ भूखंडांवर एकूण ५५ हजार घरे बांधण्याचा निर्णय घेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पांतर्गत अंमलदारांना ४५० चौरस फूट व वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना ५५० ते ६०० चौरस फूट क्षेत्रफळाची घरे बांधण्यात येणार असून, यासाठी गृहविभागाच्या अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली १५ सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना ५०० चौरस फुटांचे घर मिळण्याबाबत वरिष्ठ स्तरावर प्रयत्न सुरु असल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच कन्नमवार नगर विक्रोळी (पूर्व) येथील पोलीस वसाहती क्र. २२६ , २२८ व इतर वसाहती ह्या ५५ वर्षे जुन्या व धोकादायक परिस्थितीत असूनही त्यांचा अद्यापही पुनर्विकास झालेला नसल्याने बी.डी.डी चाळ, नायगाव व वरळी येथील पोलीस कुटुंबीयांना स्व-मालकीच्या हक्काची घरे दिलेली आहेत, त्याच धर्तीवर कन्नमवार नगर विक्रोळी (पूर्व) येथील पोलीस बांधवांना नव्याने मुंबईतच घरे बांधून देण्याची गरज निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने महाराष्ट्र पोलीस व मुंबई पोलीस दलातील अधिकारी / कर्मचारी यांना मालकी हक्काची घरे देण्याबाबत तसेच पोलीस वसाहतींचा पुनर्विकास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) शासन निर्णय, दिनांक १० ऑक्टोबर, २०२५ अन्वये ७५ भूखंडांवर पोलीस कर्मचारी, पोलीस अधिकारी व वरिष्ठ पोलीस अधिकारी यांच्याकरीता निवासस्थान तयार करण्यासाठी "पोलीस हाऊसिंग टाऊनशिप" प्रकल्प राबविण्याकरीता प्रकल्पाचा सविस्तर अभ्यास करून शासनास शिफारस करण्याकरीता अपर मुख्य सचिव, गृह यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीची पहिली बैठक दिनांक १४ नोव्हेंबर, २०२५ रोजी पार पडली असून बैठकीतील चर्चेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) व (५) याबाबत मा. लोकप्रतिनिधी यांच्याकडून निवेदन प्राप्त झाले असून त्यानुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## मुंबई पोलीस भरती प्रक्रियेत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गातून अर्ज भरलेल्या मराठा समाजातील युवक आणि युवतींवर झालेल्या अन्यायाबाबत

**(३३)** * **१५९८५ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठा समाजाला सामाजिकदृष्टया आणि शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग आरक्षण (एसईबीसी) हे माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये लागू झाले असले तरी या समाजातील युवक युवतींकडे असलेले आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गातील प्रमाणपत्र हे माहे मार्च, २०२४ पर्यंत वैध होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळेच सन २०२२-२३ च्या गतवर्षी झालेल्या मुंबई पोलीस भरती प्रक्रियेत मराठा समाजातील युवक आणि युवतींनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गातून अर्ज भरले आणि ते स्वीकारून दिनांक ७ सप्टेंबर, २०२४ रोजी मैदानी चाचणी घेण्यात येऊन मेरिटदेखील आर्थिकदृष्ट्या दुर्बल प्रवर्गातून लावले गेले असून दिनांक ११ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान लेखी परीक्षा अंतिम निवड यादीसुद्धा आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गामधून दिनांक १८ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान प्रसिद्ध करण्यात आली असून ही निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षणाच्या तयारीसाठी काहीजणांना बोलाविण्यात आले तर काही उमेदवारांना नियुक्ती सुद्धा देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या निवड प्रक्रियेला स्थगिती देऊन उमेदवारांना हमीपत्र देऊन त्यांना प्रवर्ग बदल करण्यास सांगितले गेले, परंतु प्रवर्ग बदलला तर ही मुले त्या मेरिटमध्ये बसणार नसून अंतिम निवड होऊन देखील त्यांना या भरतीतून बाहेर पडावे लागले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, दिनांक १६ जुलै, २०२५ रोजी लोकप्रतिनिधी यांनी संसदीय आयुधाद्वारे मराठा समाजातील उमेदवारांवर अन्याय झाल्याचे निदर्शनास आणून देऊन त्यांना भरती प्रक्रियेमध्ये सामावून घेण्यात यावे, अशी मागणी शासनाकडे केली असून त्यांना भरती प्रक्रियेमध्ये सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मराठा समाजास महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांकिरिता आरक्षण अधिनियम,२०२४ अंतर्गत दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ पासून आरक्षण लागू करण्यात आले आहे.
(२), (३) व (४) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई अंतर्गत पोलीस शिपाई भरती सन २०२२-२३ ची जाहिरात दिनांक २९ फेब्रुवारी, २०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर जाहिरातीमध्ये सामाजिक व शैक्षणीकदृष्ट्या

मागासप्रवर्ग (एस.ई.बी.सी.) या प्रवर्गाकरीता २५७ पदे दर्शविण्यात आली होती. सदर भरती प्रक्रियेकरीता ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक ३१ मार्च, २०२४ पर्यंत होती. तथापि, उमेदवारांना सामाजिक व शैक्षणीकदृष्ट्या मागासप्रवर्ग (एस.ई.बी.सी.) प्रमाणपत्र मिळण्यास तांत्रिक कारणांमुळे विलंब होत असल्याने आवेदन अर्ज सादर करण्यास दिनांक १५ एप्रिल, २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. कोणत्याही समाजातील उमेदवारांवर अन्याय होऊ नये म्हणून मराठा सामाजातील उमेदवारांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ई.डब्ल्यू एस.) प्रवर्गातून केलेले आवेदन अर्जही स्वीकारण्यात आले होते. मराठा समाजातील ज्या उमेदवारांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गातून अर्ज केले आहे अशा उमेदवारांना कार्यालयात बोलावून त्यांच्याकडून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक ऐवजी सामाजिक व शैक्षणीकदृष्ट्या मागासप्रवर्ग (एस.ई.बी.सी.) किंवा इतर मागास प्रवर्ग (ओ.बी.सी.) किंवा खुला प्रवर्ग या तीन पैकी एका प्रवर्गाची निवड करुन त्याबाबतचे हमीपत्र घ्यावे, सदर उमेदवारांना सामाजिक व शैक्षणीकदृष्ट्या मागासप्रवर्ग किंवा इतर मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र सादर करण्यासाठी १ महिन्यांची मुदत द्यावी व प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर गुणवत्तेनुसार त्यांना संबंधित प्रवर्गातून नियुक्ती देण्याबाबतच्या सूचना अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके यांनी दिनांक १६ जुलै, २०२४ च्या पत्रान्वये सर्व घटक प्रमुखांना दिल्या. मुंबई पोलीस शिपाई भरती २०२२-२३ ची अंतरीम निवड यादी दिनांक १७ फेब्रुवारी, २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली व दिनांक ०३ मार्च, २०२५ ते दिनांक १४ मार्च, २०२५ या कालावधीत कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली. काही आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गातून आवेदन अर्ज सादर केलेल्या मराठा समाजातील उमेदवारांनी सामाजिक व शैक्षणीकदृष्ट्या मागासप्रवर्ग किंवा इतर मागास प्रवर्ग किंवा खुला प्रवर्गाची निवड केल्याचे हमीपत्र सादर न केल्याने त्यांची निवड आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातून दर्शविण्यात आल्याचे निदर्शनास आल्याने त्यांना भरती प्रक्रियेतून अपात्र न करता पुन्हा सामाजिक व शैक्षणीकदृष्ट्या मागासप्रवर्ग किंवा इतर मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र सादर करण्याची संधी देण्यात आली. त्यानुसार सामाजिक व शैक्षणीकदृष्ट्या मागासप्रवर्ग किंवा इतर मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र सादर केलेल्या उमेदवारांचे नाव गुणवत्तेनुसार अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादीमध्ये समाविष्ट करण्यात आले. ज्या उमेदवारांना अंतरिम निवड यादीनुसार नियुक्ती दिली आहे. तथापि, अंतिम निवड यादीमध्ये ज्यांचे नाव समाविष्ट नाही अशा उमेदवारांचे नियुक्ती आदेश रद्द करण्यात आले. मराठा समाजाकरीता स्वतंत्र सामाजिक व शैक्षणीकदृष्ट्या मागासप्रवर्गातून आरक्षण लागू करण्यात आल्याने त्यांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल प्रवर्गाचे आरक्षण अनुज्ञेय ठरत नाही. त्यामुळे उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे. या प्रक्रियेच्या अनुषंगाने मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणामध्ये दाखल झालेल्या प्रकरणांमध्ये उपरोक्त प्रमाणे केलेली कारवाई मा. न्यायाधिकरणाने वैध ठरविली आहे. त्यामुळे कोणत्याही गुणवत्ताधारक उमेदवारावर अन्याय होणार नाही याची दक्षता घेण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**

**नागपूर.** **सचिव-१,**

**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.